१८

अध्याम

# परमार्थिक पद प्रकाश

सोहिरोबानाथ कृत

अध्यात्म ७०

अध्यात्मं

५

मो जगदीश्वराय

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

सोति हिरोबा नाथ कृत

# मार्थिक पद प्रकाश.

हा ग्रंथ

लक्ष्मण जिवाजी हवालदार

यांणीं

लोक कल्याणार्थ छापून प्रसिद्ध केला

इंडियन प्रिंटिंग प्रेस

शके १८०६

किंमत ४ आणे.

# प्रस्तावना.

या जगांत आजपर्यंत मोठमोठे विद्वान, साधु, संत होऊन गेले त्यांणीं स्वपर कल्याणासाठीं केलेले परमार्थ संबंधी पद्यरूपी लेख सांप्रत दृष्टीस पडतात, त्यांत महान् साधु सोहिरोबा यांणीं केलेल्या पद्यांत वैराग्य, प्रेम, अनन्यभाव, शुभेच्छा विचारणा, ध्यान, धारणा, समाधी हीं अत्युत्तम असून निराकार परमात्म्याची स्तुति, प्रार्थना, उपासना, भक्ति, ज्ञान हीं अप्रतिम दर्शविलीं आहेत. त्यांचा लाभ गरीबापासून श्रीमतापर्यंत सर्वत्र लोकांस होऊन स्वशक्त्यनुसार परोपकार करणें हें जें मानवाचें मुख्य कर्तव्य तें अंशतः तरीं सिद्धीस जावें व लोकांचें मन जगन्नियन्त्या परमात्म्याकडे वळावें या हेतूनें हा ग्रंथ छापून याची किंमत, नफ्याकडे बिलकूल लक्ष न देतां छापण्याच्या वगैरे खर्चाच्या मानानुसार फक्त ४ आणे ठेविली आहे. तरीं सर्वत्रांनी लाभ घ्यावा अशी जी माझी सविनय इच्छा ती ईश्वरकृपेनें सिद्धीस जावो. कोणी गोरगरीब साधु संत जनांस हा ग्रंथ फुकट वाटण्यांत येणार आहे.

" सहस्त्र धनुर्धर गीतायां " याप्रमाणें सत्कृत्यास कांहीं ना कांहीं तरीं विघ्नें उद्भवतात हें सांगणें नकोच. हा ग्रंथ छापण्याच्या वगैरे कामांत बऱ्याच अडचणी आल्या असल्यामुळें निर्देशल्याप्रमाणें छापतां आला नाहीं. तस्मात् " **धर्मस्य त्वरिता गतिः** " या न्यायाला अनुसरून तूर्त तयार झालेलाच भाग प्रसिद्ध केला आहे. पुढें ईश्वरकृपा झाल्यास संपूर्ण ग्रंथ प्रसिद्ध होईल*.

मुंबई, आषाढ शुद्ध
११ शके १८०६.

**लक्ष्मण जिवाजी हवालदार.**

---

* हे महान् साधु सावंतवाडी संस्थानांत प्रथम उदयास आले. व नंतर कित्येक लोकांच्या प्रेम पुरस्सर भक्तिमुळें व शिवाय लोकांस सद्धर्मोपदेश करावा या हेतूनें इंदूर, उज्जनी, दिल्ली अशा दूर दूर प्रदेशीं भ्रमण करीत उज्जनीस समाधिस्थ झाले. यांची साद्यंत विशेष हकीगत पुढें द्यावी असा हेतु आहे. ईश्वर कृपेनें सिद्धीस जावो.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं०
ठाणें सन १८

सोहिरोबानाथ कृत

# पारमार्थिक पद प्रकाश.

श्री जगदीश प्रसन्न.

## पदें.

॥ १ ॥

वंदियला भगवंत तो म्यां वंदियला भगवंत ॥ धृ० ॥
॥ भवसिंधु तारक, निज सुख कारक ।
सकलां आदी अंत, तो म्यां वंदियला भगवंत ॥ वंदि० ॥ १ ॥
॥ सज्जन रंजन, अलख निरंजन ।
भक्त जना कृपावंत, तो म्यां वंदियला भगवंत ॥ वंदि० ॥ २ ॥
॥ वेद झाले मुके, शेष न स्तवूं शके ।
ज्याचें स्वरूप अनंत, तो म्यां वंदियला भगवंत ॥ वंदि० ॥ ३ ॥
॥ नव्हे नर नारी, गैबी सूत्रधारी ।
हालवी जो जिव जंत, तो म्यां वंदियला भगवंत ॥ वंदि० ॥ ४ ॥
॥ सोहिरा ह्मणें, अनुभवीं पहाणें ।
चित्सुख-वन वसंत, तो म्यां वंदियला भगवंत ॥ वंदि० ॥ ५ ॥

॥ २ ॥

काय म्यां सांगों अगोचर नवल तुझें हो ॥ धृ० ॥
॥ पोकळ कर्ण एथ नाहीं कोण, ऐकों येतें तें काय हो ॥ का० ॥ १ ॥
॥ उगीच कीं बापुडी दिसत हे चांबडी, कठोण मृदु केंस निवडी ॥
॥ श्वेत भौतें काळें वरतें दिठीसीं कैसें दिसतें ॥ काय० ॥ ३ ॥
॥ तेंवीच जिव्हेस दिसतें हें मास, कवण येतो रस हो ॥ का० ॥ ४ ॥
॥ नासिकीं केवळ दिसतो अनीळ, कवण घे परीमळ हो ॥ का० ॥ ५ ॥

॥ देह हें झालें ऐसें कवणीं देखिलें शेवटीं कोठें गेलें ॥ काय० ॥६।
॥ ययाचा कर्ता नगवे धर्ता, येथतरी भर्ता कोण हो ॥ काय०॥ ७॥
॥ सत्ता समाधान जडा ना ज्ञान, कवणा तरी अज्ञान हो ॥का०॥८।
॥ सोहिरा ह्मणे गेलें मीपण मेलें, देह तरी चाले कैसें हो॥का०॥९॥

॥ ३ ॥

तूजवीण हो कैंचा लाभ जनीं या लोकांला ॥ धृ० ॥
॥ माझें माझें ह्मणोनी लटक्या मृगजळा भुलोनी।
केवळ देखतांची जाणूनि उगें पडले शोकाला ॥ तूज० ॥ १ ॥
॥ अविद्या लागली पाठीं चालती आडवाटीं ।
विषयासाठीं मरती मारोनी एकमेकांला ॥ तूज० ॥ २ ॥
॥ अर्थाविण तो जपतां अन्तरींचा कीर रिता ।
शिकविली तो बोले गीता वाक्य श्लोकांला ॥ तूज० ॥ ३ ॥
॥ सोहिरा ह्मणे हेतुला नासोनियां आंतुला ।
ओळखिला नाहीं कीं तुला अनेकीं एकाला ॥ तूज० ॥ ४ ॥

॥ ४ ॥

दयाघनाचें रूप कीं हें, रूपावीण अरूप कीं हें ॥ धृ० ॥
॥ भोजनावीण पोट भरतें, नादावीण कान निवृत्ति ॥ दया०॥ १॥
॥ वाचा निमोनी निघती गोष्टी रूपावीण संतुष्ट दृष्टि॥द० ॥ २॥
॥ सत्ता देखूनि व्यापक गुप्त अखंडानंदीं, मन हें तृप्त ॥ द० ॥ ३॥
॥ चैतन्य प्याला पिऊं जाय, रसनेचा हा रसची होय ॥ द० ॥ ४॥
॥ सोहिराह्मणे घटमठ पाहीं आकाश त्यांत असोनी नाहीं॥द०॥५॥

॥ ५ ॥

माई वो सखी दीन दयाळी ॥ धृ० ॥
॥ भावें भावितां करणी अगम्य तुझी स्वरूप नवाळी हो॥मा०॥१॥
॥ ऊर्ध्व मुळोहूनी शाखा आदी करोनी, तरुची जिव्हाळी हो ॥२
॥ साम्य समरसी चिद्विलासी असंसी तूं निजीं निर्मळीं हो॥मा०॥३॥
॥ आर्त रूपीं तुज जाणूनि सहज सोहिरा शरण तव चरण कमळीं।

॥ ६ ॥

भगवन्ता दर्शन देई रे ॥ धृ० ॥
॥ मी कोण मज येऊं दे कळोनी, तेथ मन हें वळोनी ।
जाऊं दे गळोनी निशिदिनी निर्गुणवनीं लय लाई रे ॥ भग०॥१॥
॥ काना ऐकवी त्रिनयना दाखवी त्वचेला कळवी रसने चाखवी ।
परीमळ लेववी शेवटीं कोण हा कोठें तूं नाहीं रे ॥ भग० ॥ २ ॥
॥ ह्मणे सोहिरा मृगजळवत संसार, दिसोनि किमपी मजला ।
रुचों देऊं नको कांहीं रे ॥ भगवन्ता० ॥ ३ ॥

॥ ७ ॥

दिगंबरा जोगी जटा धरा, शिव शंकरा तुज नमो ॥ धृ०॥
॥ पंच मुख सुख शांत रूप तूं, मदन दहन वनवास ।
गौर वर्ण वपु सुगंध हर, जय जय जगन्निवास ॥ दिगं० ॥१॥
॥ सुरवर गाती ध्याती तुजप्रती, आनंद बारा मास ।
सत्यलोक वैकुंठ भुवन वरी, स्थान तुझें कैलास ॥ दिगं० ॥२॥
॥ देह हें साज विमनचि व्याज, त्रिकाळ वाजवी तास ।
प्रपंच करितां श्रमचि शेवट, कांहींच न लागे हातास ॥दिगं०॥३॥
॥ बंधन सोडवीं वंदन करितो, सद्भावें सोहिरा दास ।
शम दमीं सोडीं इंद्रिय कोडीं, तोडीं हे मायापाश ॥ दि० ॥४॥

॥ ८ ॥

तुजवीण आणिक नाहीं रे मज, कळोनि हें आलें आजी सहज॥धृ.।
॥ अनेक रूपीं एक, नगर नायक ॥ तुजवीण०॥ १ ॥
॥ अलख निरंजना, दत्त चिद्घना ॥ तुजवीण०॥ २ ॥
॥ जगदखील पालना, हे लीला लालना ॥ तुजवीण०॥ ३ ॥
॥ भक्तजन तत्परा, प्रेम परात्परा ॥ तुजवीण०॥ ४ ॥
॥ जयजया विशुद्धा, देवा अनादि सिद्धा ॥ तुजवीण०॥ ५ ॥
॥ हृदगत प्रत सदय-हृदय निवासिता ॥ तुजवीण० ॥ ६ ॥

|| दिसतें पावेल अस्त, तूं अविनाश वस्त ||तुजवीण०|| ७ ||
|| जग नग नागरा, हे करुणा सागरा || तुजवीण०|| ८ ||
|| सुख नाहीं कोठें, संसारीं दुःख मोठें || तुजवीण०|| ९ ||
|| देह हें जायाचें, अंतीं हें जायाचें || तुजवीण०||१०||
|| जळो परतें हें पोट, आणि जळो हें चिरगुट ||तु०|| ११ ||
|| मासा करी चळबळ, परि केव्हां नेणें पडेल जाळ||तु०||१२||
|| संसारीं या सुख तैसें, केव्हां नेणें व्हेसील कैसें तु०||१३ ||
|| विषय सुखीं अनावडी, लागो तुझी पुरती गोडी||तु०||१४||
|| सोहिरा ह्मणे मागतसों, बोलासारिखे वागतसों ||तु० ||१५||

|| ९ ||

कृपालु हा भगवंत, निज भक्तांचा कैवारी || धृ० ||
|| जें कां भक्ति बीजाचें क्षेत्र, प्राणी पुण्यश्लोक पवित्र |
त्याला प्रसन्न हा चिन्मात्र, विश्व चित्रांचा चितारी ||कृपा०||१||
|| ज्याची सत्ता नवही द्वारीं, हालवी मन पवनाची दोरी |
ना तो पुरुष ना ते नारी, ऐसा गैबी जो सूत्रधारी || कृपा० ||२||
|| जो जवळची परी, पहातां जिवाचिये भितरीं |
संकट समयीं स्वरूपें धरी, नाना नटनाटक अवतारी ||कृपा०||३||
सोहिरा ह्मणे दशवे द्वारीं, अनाहत नोबतकी मनबारी||कृपा०||४||
केवळ धरुनियां इतबारी, राहिला ज्याचिये दरबारीं ||कृपा०||५||

|| १० ||

तुजवीण न गमे न गमे मज हे घडी रे || धृ० ||
|| निष्कामाची निजधामाची आरामाची |
भवसागरीं कामाची, या हरीनामाची सांगडी रे || तुजवीण०||१||
|| मायीक संसार असार हा जाणूनि जे कां भजती |
तुज ते पावती परेपर थडी रे || तुजवीण०|| २ ||
|| महानंद समुद्र पूर्णिमेचा पूर्ण चंद्र |

तो कां भुवन त्रय नरेंद्र तो तू संताचा सवंगडी रे ॥ तुजवीण० ॥३॥
॥ अज्ञान बेडी सर्वेची तोडी, पांच पांचाठायीं बिघडी ।
मनाला आपणापाशीं ओढी, मोक्षपदांचा दरवाजा उघडी रे ॥४॥
॥ ह्मणे सोहिरा निकट निरंजनीं, रंजोनियां परिपूर्ण सदोदित ।
ब्रह्मरूप निज नित्य निवासित, टांकूनि सकळीक प्रापंचीक
परवडी रे ॥ तुजवीण० ॥ ५ ॥

॥ ११ ॥

हे घनश्याम गावूं निज नामसुधा ॥ धृ० ॥
। निजसुखची एकची मानूनि, साची हारूं हा भास विविधा ॥१॥
॥ नित्य ध्यान हें गोड निदान, नाहीं मग हा भव बाधा ॥ हे० ॥२॥
। सोहिरा ह्मणे निज दिठीं लागोनी देखे स्वरूप अगाधा ॥ हे० ॥३॥

॥ १२ ॥

श्याम सुंदर घननीळा ॥ धृ० ॥
॥ तुझा तूंचि एकचि साचा तुजवीण नाहीं वेगळा ॥ श्याम० ॥१॥
॥ थोर थोरां देव सुरवरां नाकळेची तुझी लीळा ॥ श्याम० ॥ २ ॥
॥ आत्मानुभवें प्रेम स्वभावें योगियांशीं जिव्हाळा ॥ श्याम० ॥ ३ ॥
॥ सोहिरा ह्मणे निजदेहीं सुखामृत पूर्ण तूंचि हे कीं चित्कळा ॥ ४॥

॥ १३ ॥

पतीत पावन दीन दयाघन करुणाकर देवा ।
श्रवण मनन निदिध्यासें निरंतर करूं तुझी सेवा ॥ धृ० ॥
॥ परम प्रकाशक तेजोमय हें गुप्त तुझें स्वरूप ।
परतुनि दृष्टिं पहाणें, पहातां निर्गुण हें अरूप ।
परिपूर्ण परमार्थ साधनें, भरलें अमूप ।
परात्पर तूं अंतर साक्षी, हृदय भुवन दीप ॥ पतीत० ॥ १ ॥
॥ तीन्ही संधी साधुनि घेणें, सुख हें एकांतीं ।
तीन गुण हे निरसुनि शून्यीं, उगवली हे ज्योती ।

तीक्ष्ण दृष्टीं पहाणें पाहतां, दिवस ना राती ।
तितुकी प्रतिती बाणालिया मग, कुल नाहीं जाती ॥ पतीत०॥२॥
॥ तलंगति तलंगति सकळाहि, जीव चित्सिंधू आंत ।
तरंग जैसे उमटत भासत, नासत हे बहुत ।
तरुणोपाय सांगति साधू, मत हें सिद्धांत ।
तरले बहुत येणें मार्गें; देही देहातीत ॥ पतीत० ॥ ३ ॥
॥ पान्हा पिऊनि प्रेम कळेचा, हरिलें संकल्पा ।
पारंपरेनें पाहतां, भवभय दोरीच्या सापा ।
पारंगत हें करुनि, सकळाहि अहं सोहं कापा ।
पारख करितां ताठता आली, नेत्रांच्या मलपा ॥ पतीत० ॥ ४ ॥
॥ वरिली शांती, अंगीं झाला पूर्ण अनुभव ।
वरद बळें सद्गुरु प्रसादें, अक्षय वैभव ।
वमिलें मायिक, कवणाचाहि नाहीं हा भाव ।
वदली वाणी मौन्य पाहतां, रूप नाहीं नांव ॥ पतीत० ॥ ५ ॥
॥ नम्र होऊनि वृत्ति लागली, अलक्ष हें लग्न ।
नटत नटत हे कळा, अंतरीं होऊनियां मग्न ।
नख नलगे जेथ देहबुद्धीचें, विकासलें गगन ।
नमुनि सोहिरा ह्मणें कीं अवघा अलख निरंजन ॥ प० ॥ ६ ॥

॥ १४ ॥०

तुजविण रे भगवान्, कोठेंच मन हें न जडो ॥ धृ० ॥
॥ मिथ्या ऐसें जाणोनि सकळही, विषय सुख नावडो ।
प्रारब्धास्तव जे जे समयीं घडेल, तें तें सुखी घडो ॥ तुज० ॥१॥
॥ योग लक्ष निज धैर्य बळें, जिव मोहांत न सांपडो ।
आयुष्य सरल्या कधिं तरीं, देह पडेल तेथें सुखी पडो ॥ तु० ॥२॥
॥ प्रपंच राहाटीं वर्तत असतां, कोणीकडेचि ना अडो ।
वैराग्याग्निनें प्रचंड होऊनि, अखंडीत कडकडो ॥ तु० ॥ ३ ॥

॥ ह्मणे सोहिरा विपरीत बुद्धिचा कुसंग हा विघडो ।
मुमुक्षु होनउी केवळ ब्रह्मींचें मोक्ष द्वार ऊघडो ॥ तु० ॥ ४ ॥

॥ १५ ॥

तूं हर हर शंभू सदाशिवा ॥ धृ० ॥
॥ सर्व सोडूनि गर्व मोडूनि, तोडूनि टांकी तूं भवा ।
जटा जूट पशूपति तव पूजनीं, परम प्रीती हे जडो जिवा ॥ तूं० ॥ १ ॥
॥ सकल सृष्टि कल्याण कर्त्ता, अनंत रूपा तूं देवा ।
रुद्रा तूं वीरभद्रा प्रकटूनि, हृदयीं लावीं ज्ञान दिवा ॥ तूं० ॥ २ ॥
॥ ह्मणे सोहिरा नवद्वारें तुह्मी, परमामृत हें पिवा, शरवा तूं बीन परवा करूनि दे, आनंद हा नित्य नवा नवा ॥ तूं हर० ॥ ३ ॥

॥ १६ ॥

शिव हर शंकर मदनारी, देह हें अर्पण तुज केलें ॥ धृ० ॥
॥ तव भजन पूजन ध्यानीं, मन हें तन्मय होऊनि ठेलें ॥ शिव० ॥ १ ॥
॥ चित्त हें गिरीवर वधु वल्लभा, स्वरूप पहावया भूकेलें ॥ शि० ॥ २ ॥
॥ जय विश्वेश्वर भगवान, स्मरतां विषय स्मरण गेलें ॥ शिव० ॥ ३ ॥
॥ जीवनमुक्त करोनि भक्तांसीं, त्वां कैलास भुवनीं नेलें ॥ शि० ॥ ४ ॥
॥ सोहिरा ह्मणे तरी हो सखे, बहुतां जन्मीं पुण्य केलें ॥ शिव० ॥ ५ ॥

॥ १७ ॥

जय जय शंभो सदाशिव शंकर, पशुपति गिरिजा वरा रे ॥ धृ० ॥
॥ नमन करूनि सद्भावें तुज, मन अर्पण विश्वंभरा रे ।
अनाथ नाथ नमो दीन बंधु, वांच्छित दे ईश्वरा रे ॥ जयजय० ॥ १ ॥
॥ त्रिभूवन पति तूं सकळही संपत्ति, लंकापती देसी वरा रे ।
मुनिजन मोहन मानस हंसा, ये मम ह्रदयीं सरोवरा रे ॥ ज० २ ॥
॥ प्रसन्नता तव स्वप्रभ—उद्धित, उदय विवेक दिनकरा रे ।
प्रकाश पडतां आकाश भरी, मति विकाश इंदिरावरा रे ॥ ज० ॥ ३ ॥

॥ ह्मणे सोहिरा भक्ति ज्ञान, वैराग्य सह परिवारा रे।
परा प्रेम प्रमदा सुख सेंवर, ब्रह्म रंध्र गिरीवरा रे ॥जय० ॥४॥

॥ १८ ॥

ऐसा जन्म नको हा मला, देवा शरण येतों मी तुला ॥ धृ० ॥
॥ देह हें जाण जीवाला मोट, बांधोनि केलासे कडेलोट ।
तेथें श्रमतों भरतों पोट, दुःखें भोगों कोटीन कोट॥ऐसा० ॥१॥
॥ जन्मांतरींचें पुण्य पाप, प्राप्त झाले त्रिविध ताप ।
आयुष्याचें भरतें माप, डोळां पडली मोहाची झांप ॥ऐसा०॥२॥
॥ आपण पडला असतां बंदीं, आणि लोकांला निंदी ।
दुष्ट दुरात्मा हा द्वंदी, मरोनी होतो संमंधी ॥ ऐसा० ॥ ३ ॥
॥ ज्याला सुटेना हे सुटका, धरितो अभिमान लटका ।
अडला देह बुद्धि अटका, ईश्वर स्मरेना एक घटिका॥ऐसा०॥४॥
॥ न रुचे संतांची सोबत, पाठीं धांवेना लोंबत ।
नाहीं योगाला झोंबत, ना ऐके अनाहत नौबत ॥ ऐसा० ॥ ५ ॥
॥ सोहिरा ह्मणे यांतूनि सोडीं, आंतरीं मनाच्या ओढी ।
दहाहि इंद्रियें कोंडीं, लावीं आत्मस्वरूपीं गोडी ॥ ऐसा०॥६॥

॥ १९ ॥

जगज्जीवनजी दिनोद्धार ॥ धृ० ॥
॥ आत्मानात्म विवेक सुमती, सुख दावी हें सारासार ।
लटीकें देह हें गेह करूनि, जीव भोगितसे दुःख फार॥जग०॥१॥
॥ मुक्त करोनियां गुप्त स्वरूपीं, देह दर्शन उक्त प्रकार ।
हे विश्वंभर करुणाकर लवकर, भव सिंधू कर पार॥जग०॥ २ ॥
॥ योग युक्ति दे शून्य मंडलीं, मन हें जाऊं एक वार ।
भक्त काज कल्पद्रुम, सद्गुरु दाता परम उदार ॥ जग० ॥ ३ ॥
॥ ह्मणे सोहिरा काम क्रोध, मद मत्सर दानवां करणें मार ।
युगायुगीं तूं धरिशी, नाना रूप लीला अवतार ॥ जग० ॥ ४ ॥

॥ २० ॥

ऐसी करी हो दया, परतोनि हें मन न धरी, देहाची माया॥धृ०॥
॥ मी मजला पाहोनि, स्थिरतेसी राहोनी, निरंजनीं विसावोनी ।
कल्पना हे जाय जहीं आपापें लया ॥ ऐसी०॥ १ ॥
॥ पाहों जातां जव आदी, अंतीं लागली समाधी ।
गेले यांची नाहीं शुद्धि, जयांचे ठायीं ॥ ऐसी० ॥ २ ॥
॥ कवणा ठायीं कवण, गेले, कोण कोणा भेटले ।
अवचटेंची काय झालें, उमजेना जया ॥ ऐसी०॥ ३ ॥
॥ सोहिरा ह्मणे निरामया, झालीची नाहीं हे काया ।
मिठी पडोनि तन्मयेशीं, मिनला चिन्मया ॥ ऐसी०॥ ४ ॥

॥ २१ ॥

भजन तुझें आवडो वो, मजला विषय सुख नावडो ॥ धृ० ॥
॥ अविनाश आत्मारामा, भक्त कल्पद्रुमा ॥ भजन० ॥ १ ॥
॥ गैब चराचरा, अगम अगोचरा ॥ भजन० ॥ २ ॥
॥ सज्जन रंजना, अलख निरंजना ॥ भजन० ॥ ३ ॥
॥ असोनियां लक्षा, प्रत्यक्ष अलक्षा ॥ भजन० ॥ ४ ॥
॥ मौन्य महा शून्या, अखंड चैतन्या ॥भजन०॥ ५ ॥
॥ पहातां अरूपा, आनंद सत्ता रूपा ॥ भजन०॥ ६ ॥
॥ टांकुनियां, गुणातीत निर्गुणा ॥ भजन० ॥ ७ ॥
॥ वृत्ति लागो एका, नगर नायका ॥ भजन०॥ ८ ॥
॥ सकळ मूळ बिंबा, विकास निरालंबा ॥ भजन०॥ ९ ॥
॥ जगभ्र अंबरा, दिव्य दिगंबरा ॥ भजन० ॥ १० ॥
॥ मागत्याचें मागणें, तुझें हेंचि देणें ॥भजन०॥ ११ ॥
॥ सोहिरा ह्मणे मी मोड, अवीट आणि गोड॥भजन०॥१२॥

॥ २२ ॥

मजवरी तूं दया करीं रे ॥ धृ० ॥
॥ रूप रेख विना तूं एक पाळक चालक सकळ चराचरीं रे॥म०॥१॥

॥ अखंड अनंत अपार अयरूपा दे तूं अलभ्य हा लाभ आम्हाला
अभ्यंतरीं रे ॥ मजवरी० ॥ २ ॥
॥ चित्सुख सिंधू आनंद कंदू परमामृत बिंदु ॥
व्हेई अजरामर पद परात्परी रे ॥ मजवरी०॥ ३ ॥
॥ सोहिरा ह्मणे स्वरूप दावीं लय हें लावीं ॥
निर्गुण निरंजन निरामय चिदांबरी रे ॥ मजवरी० ॥ ४ ॥

॥ २३ ॥

तुजवीण आणीक नाहीं काम ॥ धृ० ॥
॥ कार्यी कारण निर्गुनियां, जहीं पाविजे निजस्वरूपीं आराम॥तु॥१॥
॥ काजीं काज हें जाणूनियां निकें सर्वही देखतां आत्माराम ॥तु०॥२॥
॥ सोहिरा ह्मणे मग नगरूप हारोनी, निवटीजे एक सकळी हें
हेम ॥ तुजवीण०॥ ३ ॥

॥ २४ ॥

भगवन्त दाता, स्वामी तो आठव आतां ॥ धृ०॥
॥ परमानन्द प्रकाशवन्त, ज्याला नाहीं आदि अन्त ।
जो कां ध्याती अखंड सन्त, धरोनि जाती निर्गुण पन्थ ।
अन्तरीक्ष हें लावुनीया लय, दक्ष होउनी मोक्ष सुखाला,
सहज समाधी रहातां ॥ भगवन्त० ॥ १ ॥
॥ जेथूनि झाली सकळ सृष्टि, त्याचा कर्ता न दिसे दृष्टि ।
ह्मणूनि होतें मन हें कष्टी, ऐकूनी अवघ्या ग्रंथीं गोष्टी ।
स्थावर जंगम नाना लीला, विचित्र वर्णी, शोभत धरणी,
तापत तरणी, अगम्य करणी, चरित्र हें पहातां ॥भगवन्त०॥२॥
॥ ह्मणे सोहिरा आंगीं जडला, आधींच आहे नव्हे घडला ।
प्राणि हा संदेहीं पडला, उपाधींत सांपडला ।
त्याचे दृष्टी ईश्वर दडला, ऐसा वेदान्तीं निवडला ।

जो हा व्यापक आत्मा अन्तर साक्ष परिपूर्ण सनातन गोड दिसे सांगा ॥ भगवन्त०॥ ३ ॥

॥ २५ ॥

विश्वास ठेवीं प्राणिया, नारायण हरी वरा रे ॥ धृ० ॥

॥ ज्यानें निर्मिलें ब्रह्मांड, एवढी पृथ्वी नवखंड, तीन्ही देव त्रिभुवन बंड, यम धर्म जीवाला दंड, भूतीं भूत पिंड उदंड, जेणें चालतसे हें शरीर रे ॥ विश्वास० ॥ १ ॥

॥ ब्रह्मादि वंदिती ज्याला, नेति वेद म्हणती त्याला, या जगाचिया पित्याला, किं या विश्व भरोनि रित्याला, तूं नको कीं विसरूं त्याला, क्षण भाग्याचिये भरी रे ॥ विश्वास० ॥ २ ॥

॥ अवलोकुनियां भाळीं, घालीं योगासन हें त्रिकाळीं, दिठी देऊं नको आभाळीं, दृश्य पदार्थ या गाभाळीं, महा तारुण्य लहरी रे ॥ विश्वास० ॥ ३॥

॥ म्हणे सोहिरा भवतारी, देव युगायुगीं अवतारी, जो पुरुष नव्हे नारी, हा आकार चित्र चितारी, नको घालवूं त्या वीण हो हे वांच्छा नाना परी रे ॥ विश्वास० ॥ ४ ॥

॥ २६ ॥

तूं राम राम स्मर रे अगम अगोचर, अनादि सिद्ध अच्युत करुणाकर रे ॥ धृ०॥

॥ असोनि न दिसे, देहीं कसा असे, चाळवी हें अन्तर रे।
साधु समागम करूनि पुसरे, हा भवसागर तर रे ॥ तूं० ॥१॥

॥ अन्तवन्त हें शरीर यास्तव, त्वरीत सार्थक कर रे, विष शमूनि संतोष पावला, जपतां शीव शंकर रे ॥ तूंराम० ॥ २ ॥

॥ २७ ॥

यारे शिवशंभूचें भजन कराया, भवसिंधू तराया ॥ धृ० ॥

॥ होईल सार्थक या जन्माचें; या जन्माचें येणें ।

मोचन या कर्माचें; स्वधर्माचें मूळ बीज हें निज कर्माचें ।
विवेक सुमति सुनिश्चय चित्तीं धराया ॥ १ ॥ या ॥
॥ माया मृगजलवत काया जाणा, यांत भ्रमतो तो मूर्ख ।
तूं जाण अजाणा, याला भोगुनी त्यागितो साधु ।
सुजाणा, शुद्धभावें स्मरणें गौरीवराया ॥ २ ॥ यारे० ॥
॥ ईशान्येस हा नित्य स्मशानवासी, सकळ भूतावळी ।
आहे त्यापाशीं, राज्य सांडुनी निघाला तपासी ।
राम जपतो कीं त्रिविधताप हराया ॥ ३ ॥ यारे० ॥
॥ सोहिरा ह्मणे हा विश्वाभ्र अंबर ।
ज्याला गाती हे नारद तुंबर ।
दशदिशाचें पांघुरला अंबर ।
जटाधारी हा अवधूत दिगंबर ॥ ४ ॥ यारे० ॥

॥ २८ ॥

लागोरे तुझें ध्यान परब्रह्मा ॥ धृ० ॥
॥ व्यक्त ना वर्ण आनन्द पूर्ण, तेथ हें अन्तःकर्ण ॥ १ ॥ लागो० ॥
॥ आत्म आवडी निर्गुण, चाडी हे अवीट गोडी ये मन ॥२॥ ला०
॥ येऊं जातां शुद्धि, विराली हे बुद्धि निरन्तर समाधि ॥३॥ ला०
॥ सर्व सदोदित दिवस ना रात, उचित चिंतनीं चित्त ॥ ४ ॥ ला०
॥ ना पवन गगन लगन सर्वा निराळा ब्रह्मांड गोळा तेथचीं
कीं हा डोळा ॥ ५ ॥ ला० ॥
॥ सृष्टीचें बीज सत्ता सहज हे उन्मनी निज ॥ ६ ॥ लागो ॥
॥ सोहिरा ह्मणे निजधाम अनाम अखंड आत्मारामा ॥ ७ ॥ ला०

॥ २९ ॥

भगवत भजनीं हें मन लाव ॥ धृ० ॥
॥ ममता मोहें जीव हा विकळे, शरीर जाईल केव्हां न कळे ।
आपणासंगें न येती सकळें ऐसें समजुनि त्वरित घे लाघव ॥ १ ॥ भ०

॥ सर्वां घटीं हा आत्माराम, तेंची आपुलें निजधाम ।
केवळ तूं निःकाम, होईं टाकूनी द्वेष दुभाव ॥ २ ॥ भग० ॥

॥ व्यापूनि चराचर जंगम, स्थावर स्वरूप अनावर त्यावर करणे तलाव ॥ ३ ॥ भग० ॥

॥ ह्मणे सोहिरा कीर बोलते- सकळ पोले कांहीं अन्तरीं असूदे भोलाव ॥ ४ ॥ भग ॥

॥ ३० ॥

प्राण्या देव देव भजरे नित्या नित्य विचार करुनि, मग सहज समाधीं नीज रे ॥ धृ० ॥

॥ संसार माझा मींची राजा, ह्मणवूनि माजा येऊनि भाजा ।
छंदें लाजा सोडूनि काजा, अर्थीं पांजा पांजी ।
करोनी भल्यार्शी गांजा गांजी करिसी ।
दूत दंडिती यम झडती गळां कीं पडवी कढई कढती ।
श्रांत अडती प्राणी रडती आपदा घडती हें घडी घडी सांगतों तुज रे ॥ १ ॥ प्रा० ॥

॥ अभ्रींची छाया तैशी काया, लटकी माहा कीं नठ जाया
कीं नरकाया जाती वांया, लाग उपाटा सद्गुरु राया ।
भवाब्धीला या तरायाॅ ह्मणुनि पांयां ।
वन्दन करोनि बंधन तोडीं, कुसंग सोडीं सुसंग जोडीं ।
अखंड गोडी लागोनी उमज तूं जीवींचें हें निज गुज रे ॥ २ ॥ प्रा० ०

॥ ह्मणे सोहिरा नांद विंदातीत मुकुंदा ज्ञानारविंदा ।
तील अमोदा अमीत अमंदा या गोविंदा परमानंदा ।
दृष्टि मुष्टि जो कां न गवे सृष्टि चाळक पाळक सकळ व्यापक ।
त्रिभुवनींचा नायक अमृत बिंदू पूर्ण इन्दु ।
कृपा सिंधू ब्रह्म अनादी जें निज बीज रे ॥ ३ ॥ प्राण्या० ॥

॥ ३१ ॥

आण ध्यानीं त्या मनमोहन गहनाला ॥ धृ० ॥
॥ निशिदिनींगा राहोनी उगा निजरूपीं उमगा आनन्द घनाला
॥ १ ॥ आण० ॥
॥ सेवीं सज्जनाला, ज्ञान यज्ञनाला ।
सोडूनि जनाला, तेथीं लाग भजनाला ॥ २ ॥ आण० ॥
॥ इन्द्रियें निरोधीं, कवण मी शोधीं ।
त्रिकुटीं कीं वन्द करीं पवनाला ॥ ३ ॥ आण० ॥
॥ सोहिरा ह्मणे निजधामीं निजा मिळोनिची जा गगनाला ॥४॥आ०

॥ ३२ ॥

तसा तूं भजरे आपुल्या मुलाला ॥ धृ० ॥
॥ न दावितां गोडी, गुंतोनिया चाडी ।
शोधुनी काढी, जशी मुंगी गुळाला ॥ १ ॥ तसा ॥
॥ कोठें तें वन कोठें जीवन धावन, करितो भ्रमतो जसा कम-
ळाला ॥ २ ॥ तसा० ॥
। चंदन आंगा उमजोनि चांगा ।
जडतो नाग जसा परिमळाला ॥ ३ ॥ तसा० ॥
॥ ह्मणे सोहिरा देव भक्त एकची होती ज्योती ।
ज्योती मिळोनी, जाय जसें लवण जळाला ॥ ४ ॥ तसा० ॥

॥ ३३ ॥

भगवंताचे गुण गारे श्रवण मनन निदिध्यास विचक्षण
एक नको राहूं उगारे ॥ धृ० ॥
॥ सायासें सांपडली हे नर तनु दुर्लभ काळ हा नको घालवूं
वा उगारे ॥ १ ॥ भ० ॥
॥ बळवान मी धनवान मी कीं विद्वान हें टाकुनी गर्व फुगारे ॥२॥भ०

॥ जन्मा झाला कवण गेला कवण मनाला चाळणवाला आधीं याला उमगारे ॥ ३ ॥ भग० ॥

॥ जैसें जळ गारे कनक नगारे, तैसा व्यापक अनेक एक जगारे ॥ ४ ॥ भग० ॥

॥ ह्मणे सोहिरा वृत्तींची रागती तूर्या रागती जेथ वाजती नित्य नगारे ॥ ५ ॥ भग० ॥

॥ ३४ ॥

वारंवार तुह्मी परब्रह्म आठवा तुटली सोय तुमची तुह्मी परतोनी गांठवा ॥ धृ० ॥

॥ महा शून्यीं चैतन्य मनाला पाठवा ॥ १ ॥ वारंवार० ॥

॥ लांब रुंद उंच नीच नव्हे मोटवा ॥ २ ॥ वारंवार० ॥

॥ जातीचा अजा त्या घरीं नेउनी बाटवा ॥ ३ ॥ वारंवार० ॥

॥ निर्विकल्पीं कल्पना या सकळ आठया ॥ ४ ॥ वारंवार ० ॥

॥ सोहिरा ह्मणे आंगीं, पूर्णानन्द दाटवा ॥ ५ ॥ वारंवार० ॥

॥ ३५ ॥

यारे सज्जन भजन कराया ॥ धृ० ॥

॥ तन मन धन हें अर्पूनी, सदीं सत्संग धाराया ॥ १ ॥ यारे० ॥

॥ आदी अन्तीं निज सुख शान्ती एकान्तीं वरत्या ॥ १ ॥ यारे ॥

॥ विषयां विकले तीं विद्या शिकले तीं पोट भराया ॥ ३ यारे० ॥

॥ जन्मा येउनी उगेची गेले तीं व्यर्थ मराया ॥ ४ ॥ यारे० ॥

॥ सोहिरा ह्मणे तुह्मांप्रति म्या सांगतों हेंचि तराया ॥ ५ ॥ यारे० ॥

॥ ३६ ॥

हें तूं उमजरे अन्तरींचें गुजरे ॥ धृ० ॥

॥ साक्ष दृष्टीचें प्रेम वृष्टीचें सकळ सृष्टीचें बीजरे ॥ १ ॥ हें तूं० ॥

॥ स्वानंदाचें विहंगमाचें उडणें साचें बहु वाचाचें पूजरे ॥ २ ॥ हें तूं० ॥

॥ सोहिरा ह्मणे हें विसरा मागें, अनुभव आंगीं येउनी लागे, चि-
न्मय देजे निजरें ॥ ३ ॥ हें तूं० ॥

॥ ३७ ॥

श्री गुरु भज आजी मना रे ॥ धृ० ॥

॥ चंचळपण टाकुनी घेई, सुख हें भज माजी मनारे ॥ १ ॥ श्री०॥
॥ निरंजनीं रंजोनिया, उमज कीं हें निज काज ॥ २ ॥ श्री०॥
॥ सोहिरा ह्मणे आपणापें तुर्येचा धरी माज ॥ ३ ॥ श्रीगुरु० ॥

॥ ३८ ॥

स्मर पार्वतीच्या वराला ॥ धृ० ॥

॥ श्रवण मनन निदिध्यास नयनीं ।
जनीं वनीं पाहुनी, विसरीं तूं आपपरासीं ॥ १ ॥ स्मर० ॥
॥ जटा मुकुट नीलकंठ त्रिलोचन पंचानन ।
मुनिजन मनमोहन वृषभारूढ हराला ॥ २ ॥ स्मर० ॥
॥ खपरु डमरुधर पिनाकपाणी, दक्षयज्ञ मथन मदनारी ।
देतो परम अभय प्रद वरद कराला ॥ ३ ॥ स्मर० ॥
॥ ह्मणे सोहिरा अर्चन वंदन आत्म निवेदन नवविध भजनीं ।
सकळही संपत्ति चालुनी येती घराला ॥ ४ ॥ स्मर ॥

॥ ३९ ॥

शिव शंभु शंकरस्वामी, निजभावें पुजावा तुह्मीं ॥ धृ० ॥

॥ विभूति लेपन अवघे शरीरीं, व्याघ्रांबर गजचर्मधारी ।
वामांगीं हे गिरिजा नारी, कबरी भार जटाधारी ॥ १॥ शिव०॥
॥ पंचमुख त्रिलोचन भोळा, कंठीं धरिलें हळा हळा ।
वरती झळती रुंडमाळा, आज्ञा समर्थ कळीकाळा ॥ २ ॥ ॥ शि०।
॥ आरूढोनि वृषभ वाहानीं, ज्याला प्रियकर शंखध्वनी ।
डमरू त्रिशूळ पिनाकपाणी, स्मशानवासी निर्वाणी ॥ ३॥ शि०॥
॥ विराजित भूफणी अजगर, शशी शेखर गंगाधर ।

ज्याची पूजा करिती अमर, ऐसा अवधूत दिगंबर ॥ ४ ॥ शि० ॥
॥ रिद्धि सिद्धि ज्याच्या दासी, स्मरणें सकळ पातक नाशी ।
ह्मणे सोहिरा निजभक्तांसीं, उदार कैलासवासी ॥ ५ ॥ शि० ॥

॥ ४० ॥

आनंदमय असो चित्त हें ॥ धृ० ॥
॥ दृश्य भास हा नाश पावे, घडी घडी या वर मन जें धांवे ।
रेतानि मुळोलें वळोलें व्हावें, समाधी सुख अवचीत हे ॥१॥ आ०॥
पस्थावर जंगम भूतग्राम, नाना लीला रूपनाम ।
आंनूनि खेळवी शरीरचर्म, आहे नाहीं हरी विरचित हें ॥ २ ॥ आन० ॥
॥ सर्व व्यापक अनंताला, प्राण्या स्मर तूं भगवंताला ।
तद्रुप मानी जीवजंताला, तुज सांगतों करीं हित हें ॥ ३॥ आन०॥
॥ ह्मणे सोहिरा तारक स्वामी, लय लागो तें आत्मारामीं
ज्ञान कळा हे अन्तरयामीं, सदां कीं सावचित्त हें ॥४॥ अन० ॥

॥ ४१ ॥

तुह्मी वन्दा सकळही साधु वृन्दा, न करावी हे निन्दा ।
सोडुनि सकळहि धंदा, संगति सद्गति पावे जीव हा अक्षय परमानन्दा ॥ धृ० ॥
। तसन्त वृत्ति ज्यांची सत्त विषयांसीं घसन्त, जे कां न करिती पसन्त, जेथें जाती तेथें चित्सुख ज्ञान वनी घे वसन्त॥ १ ॥
जे गाती स्वरूपाचे संगाती, देह हें तूं माती ।
मिथ्या हे कुच जाती, अजरामर रूपीं तद्रुप झाले हारपला दीन राती ॥ २ ॥ तुह्मी० ॥
॥ मन तें झालें कीं उन्मन, इंद्रियां दमन, पुनरपि नाहीं आगमन
खेचरी मुद्रा लावुनी त्यांहीं, निर्गुणीं केलें गमन ॥ ३ ॥ तुह्मी०
॥ शरण यावें त्याला, नको मानूं भलत्याला, परमुखीं झुरत्याला,
ह्मणें सोहिरा भाषण करणें पाहुनियां पुरत्याला ॥ ४ ॥ तु० ॥

अरे तूं धरूं नको धरूं नको लटिका हा अभिमान ।
शाश्वत नाहीं रे संसारीं देह कोणा जमान ।
जेथुनी आलासी जन्माला तेथ धरीं इनाम ।
सहसा होऊं नको होऊं नको भगवन्ती बेईमान ॥ ध्रु० ॥

हें तूं जाणरे सुजाणा दोंदिवसांचें वस्त्व,
आयुष्य कितुकें हें कळेना कसा येतसे वक्त,
कांहीं गुरुमुखें उमजूनि घे पात्र निरंजन तक्त,
याल: दिरंग तूं करूं नको शेवट पडशील फक्त ॥ १ ॥अरे०॥

॥ पुरता पहावा तनुचा चाळक हा कोठें,
अनुभवीं पहातां पहातां मन हो थोटें,
सहसा न येचीरे दाखवितां हा ह्मणुनि बोटें,
रूपरेख विना अगोचर हेंचि गुढ मोठें ॥ २ ॥ अरे० ॥

॥ सावध करितां रे घरबार, भजनाचा करभार, देऊन सोडूं नको दरबार मुळींचा वारंवार, ॥ ३ ॥ अरे० ॥

॥ स्वरूप सागरींचे तरंग, विचित्र नाना रंग, आंवरी पवनाचा तुरंग चाल तूं अन्तरंग ॥ ४ ॥ अरे० ॥

॥ गुप्त हे सत्ता ते कैसी तज काम क्रोध हे वर्ज, करोनि करणे तो देव अर्ज, नाहीं जनासीं गर्ज ॥ ५ ॥ अरे ॥

॥ नको हे साधुची हरकत, नाहींरे बरक्त, निंदा वादाचें मोठें खत, बधीर मुका जन्मत ॥ ६ ॥ अरे० ॥

॥ आतां जिवीत्व हें उद्धारीं, चित्त दे जगदोद्धारीं, गुंतु देऊं नको आकारीं, रम तूं निराकारीं ॥ ७ ॥ अरे० ॥

॥ सांडीं विषयाचा विलाप, कर्म क्रिया कलाप, भगवान गुणानुवाद अलाप, महानन्दीं मिलाफ ॥ ८ ॥ अरे० ॥

॥ भव हा दोराचा रे साप, कोणा पुण्य पाप, भ्रांती जावी हे निःपाप, अरूपीं आपें आप ॥ ९ ॥ अरे० ॥

॥ भेटुनि त्रिवेणीचा संगम, मन हा सारंगम, सहस्त्र दळीं पावावा सुगम, मार्ग विहंगम ॥ १० ॥ अरे० ॥

॥ जेथ वेदाचा न चालि तर्क, मावळलें चंद्रार्क, महा अद्वैत पिऊनि अर्क, सोहिरा ह्मणे हो गर्क ॥ ११ ॥ अरे० ॥

॥ ४२ ॥

सद्गुरुसीं हटका, आतां करा आपुली सुटका ।
दृश्यभास नाश पावे स्थिर नोहे घटिका ॥ धृ० ॥

। लिंग देहीं यम दूतां सांपडला अटका ।
आत्मज्ञान उमजोनियां अधींच तुह्मी सटका ॥ १ ॥ सद्गु० ॥

। करितो लीला टिळेमाळा प्राणी निट नेटका ।
केव्हां नेणों पाठीवर काळ मारील मुटका ॥ २ ॥ सद्गु० ॥

॥ भजनावांचुनी वेळ कधीं घालवूं नको लटका ।
मनीं राम, मुखीं राम, करीं माळ चुटका ॥ ३ ॥ सद्गु० ॥

॥ सोहिरा ह्मणे राहूं नका घट जैसा फुटका ।
निरंजनीं पूर्ण बोध प्रेम पिवा घुटका ॥ ४ ॥ सद्गु० ॥

॥ ४३ ॥

पाव ज्ञान दान ध्यान लावीं या मना ॥ धृ० ॥

॥ याच देहीं याच डोळां मुक्तीचा सोहाळा ।
भोग राज योग वश्य करोनी सांडीं कामना ॥ १ पाव० ॥

॥ दिसतें तें हें नासतें कीं हें अविनाश असतें कीं हें वसतें ।
तुझें हृदयीं असोनी तुजला कामना ॥ २ ॥ पाव० ॥

॥ सद्गुरुशीं शरण जावें, हंमेशा भजावें, निजगुज हें वुजावें जावें गमन या मना ॥ ३ ॥ पाव० ॥

॥ सोहिरा ह्मणे आहे नाहीं पाहीं, तूं सबाह्यअंत्र, आनन्दवन्तरूप निज धामना ॥ ४ ॥ पाव० ॥

॥ ४४ ॥

अजुनि समजुनि काय बसलासी ॥ धृ० ॥

॥ संतसमागम किमपि न रुचे, इंद्रिय वर्ग हें मिळवुनि लुचें ।
परिणामाचें हीत हें न सुचे, नर देहीं येऊनी तूं फसलासी
॥ १ ॥ अ० ॥

॥ वंधेचें संतान प्रपंच, एकच जागीं मिळती पांच ।
मिथ्या लागली तुज ही आंच, मोह चिकाला तूं डसलासी
॥ २ ॥ अ० ॥

॥ भ्रमलासी हा ध्यास वाहतां, पाहिला ना कधीं स्वस्थ राहातां ।
लाज न वाटे हें दुःख सहतां. कुसंगेंची तूं बसलासी॥३॥अ०॥

॥ सोहिरा ह्मणे मुळ नसलासी, चुकलासी परब्रंह्मा असलासी ।
अन्यथा ज्ञाने कसलासी, केवळ मूर्ख तूं मजला दिसलासी॥४॥अ९

॥ ४५ ॥

पावे नासी धुर्का, हा कसा रे तूं मूर्खा ।
जीवाचा हा कोण धनी आण वेगीं तर्का ॥ धृ० ॥

॥नानापरी संसाराचा, बसतो तुला चुर्का ।
लाज सोडुनी काज करिसी फुकट पडसी नरका ॥ १ ॥ पा०

॥ रसनेवीण कसा घ्यावा ब्रंह्मरस भुर्का ।
कसा द्यावा मनावरी गगनाचा हा बुर्खा ॥ २ ॥ पावे० ॥

॥ पाखांड लंड धंड द्वेषी स्पर्श होनां तुर्का ।
ब्रंह्मबीज हाची द्विज देखोनियां गुर्का ॥ ३ ॥ पावे० ॥

॥ आला वेळ तूतें घ्यावा साधुचिया हुर्का ।
बिनला ज्या बोध गांज्या गैब मार झुर्का ॥ ४ ॥ पावे० ॥

॥ वात पित्त देहीं अती कफाचा हा बर्का ।
सोहिरा ह्मणे या रीतीने मोक्ष काज उर्का ॥ ५ ॥ पावे०॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

॥ ४६ ॥

हरिस्मरण-सुख हें जरी घे, तरी मोहभ्रमीं न रिघे ॥ध्रु०॥

॥ श्रवण मनन निदिध्यासें करूनि रज तम हा दाग निघे ।
मिथ्या मानिलें सकळ दृश्य हें पुनरपि नयनीं न घे॥ १ ॥हरि०

॥ येणें गुण्ये करूनि वर्तन किंभपि न राहणें अघें ।
भक्ति ज्ञान-वैराग्य दशा हे नित्य हृदयीं वळघे॥ २ ॥ ह० ॥

॥ ध्यान धरोनि निरंजन वनीं दृढाभ्यास लावुनि घे ।
तरीं तें पद पावेल जेथहें ब्रंह्मा-हरि-हर तीघे ॥३॥ हरि० ॥

॥ ह्मणे सोहिरा आत्म रसाची प्राणी नित्य चवी घे ।
अंतर बाहेर तैंची कीं व्यापक ब्रंह्मची हें अवघें ॥४॥ हरि० ॥

॥ ४७ ॥

केवळ विस्मृति हा प्राणी ईश्वरीं लय लाविना ॥ ध्रु० ॥

वितंड पाखंड स्थापी, आचरणें महा पापी ।
निंदा द्वेषें सदा दापी, भरेना कीं अनुतापीं ।
अद्यापि विषयीं विट येईना ॥ १ ॥ केवळ० ॥

॥ आत्म शुद्धि नाहीं ज्याला, उद्योगा खालीं गेला ।
संसार सत्यची केला, निवान्त होऊनी ठेला ।
अद्यापि समजुनी ज्याची दुष्ट बुद्धि जाईना ॥ २ ॥ केवळ० ॥

। बहुत जन्म फिरला मागां, अद्यापि जो नव्हे जागा ।
त्याला तुह्मीं किती सांगा, ज्याला पुढें नरकी जागा ।
ऐकुनिया येतो रागा वृत्ति कांहीं साहीना ॥ ३ ॥ केवळ० ॥

॥ सोहिरा ह्मणे संताचे भेटीला जो कधीं न वचे ।
श्रवण मनन कीर्तन न रुचे निंदा द्वेष बहुत सूचे ।
विश्व व्यापका ह्दय स्थाचे नित्य गुण गाईना ॥ ४ ॥ केवळ ।

॥ ४८ ॥

प्राण्या तुझा परिणामीं कठीण प्रकार ॥ धृ० ॥

॥ तुला संत भेटेल कोटीचा, परिलाभ नाहीं भेटीचा, शिकविल्या बोला हे शेवटीचा हुकार ॥ १ ॥

॥ तुला याद नाहीं आदली, कल्पना तुज बाधली, नाहीं योग रणीं साधीली, मन मृगाची शिकार ॥ २ ॥

॥ सोयरा ह्मणे झांकळशी, जन्म मरणा अःकळसी, जोंवरि अंतर्दृष्टि नोळखसी, ब्रह्म निराकार ॥ ३ ॥

॥ ४९ ॥

हकनक आयुष्य जाय, प्राण्या उगाचि बससी काय ॥धृ०॥

॥ मनासि मानेल तें तूं करिशी, देवासी कां न साय,
विचार बोलुनि अवघा करिसी, कृत्रिम हा व्यवसाय ॥ १ ॥

॥ अति प्रीतीनें देहा पाळिसी, भिक्षुक देति दुहाय,
भोग भोगितां रोग उठति तुज रक्तपित्त कफवाय ॥ २ ॥

॥ स्वदाराहो पर दाराहो, भुलणें हाचि अपाय,
अनुतापावीण नरकीं पडसी, मग हा न चले उपाय ॥ ३ ॥

॥ अनादि ईश्वर सत्य अमृत हें, ह्मणोनी सोयरा गाय,
मलाहि दिसतो तुह्मां सांगतों, पुढील तरणोपाय ॥ ४ ॥

॥ ५० ॥

तो धन्य प्राणी हरिगुण रस वर्णित वाणी धृ० ॥

॥ नरदेहीं सावध झाला, विवेक हा. हृदयीं आला,
नित्य निजबोधें घाला, ब्रह्मानंदी निमाला,
संकल्प विकल्प चित्ती न आणी ॥ १ ॥

॥ भ्रम भेद ज्याचा गेला, निश्चय हा ज्याणे केला,
तन्मय होऊनि ठेला, जिताची असतां की मेला,
अंति गति पावला निर्वाणी ॥ २ ॥

॥ अविनाशी घेतो गोडी, नाशिवंत संग सोडी,
कल्पना हे समूळ मोडी, मनाच्या अनेक ओढी,
पुनरपि न पडे ताणाताणी ॥ ३ ॥
॥ नामरूप मिथ्या भास, ह्मणोनि धरिना आस,
वैराग्यें हा उपजे त्रास, करी निरंजनीं वास,
आत्महित पुरतें ध्यानीं आणी ॥ ४ ॥
॥ सोयरा ह्मणे सारांश, शोधियेला शुद्धांश,
जाणें उद्धरिला वंश, जैसा कीं तो राजहंस,
निवडितो दूध आणि पाणी, तो धन्य प्राणी ॥ ५ ॥

॥ ५१ ॥

॥ तो काय प्राणीं विसरला हरिला जन्मा पासुन तो ॥ धृ०॥
॥ देहालामि ऐसें मानो निरंतर, आपणावानी संशयाच्या पडला-
रानीं, विचार हा नघे कानीं, डुलतसे मोहमंदिरा प्राशून
तो ॥ १ ॥
॥ करितांहा प्रपंचधंदा, आठविना गोविंदा, नित्यकरीद्वेषनिं-
दा सापडला भव बंधा चिंतेने चिचूर केला ग्रासून ॥ २ ॥
भुललाजो शब्द नांदे, संतोषला शास्त्र वादें कीर्तिसाठीं
विद्यासाधी ज्याला अभिमान बाधी नानाछंदें बुद्धी गेली
नासून ॥ ३ ॥
॥ अवकाश झाले वेळे भक्तासा खेळ खेळे अन्यथाजो सुखांत
लोळे गर्वमद ज्याला ओळे सांगुंजातां बोले डोळे त्रासून
तो ॥ ४ ॥
लटकें खरें करिहा भाजून व्यवहारीं जो घेतो घांसून नकलक-
री मारी हांसून, त्रिविधतापें घेतो लासून दुःख शोकें पडतो
दांत वासून ॥ ५ ॥
॥ सोयरा ह्मणे व्यर्थचिजन्म निष्फळ ज्याचें क्रियाकर्म पांघुरला
शरीर चर्म नेणे जोका मुळचें वर्म कोण कामचा हा काय अ-
सून तो काय प्राणी ॥ ६ ॥

॥ ५२ ॥

हरी स्मरणा विस्मरण तरी तुझें काय जिणेंरे असून ॥ धृ० ॥
॥ स्वार्थेन पहासी सार्थकन करिसि कोणासि पाहना पुसून, पुढें नाहीं गति मलिन झालि मति साधुचि संगति नसून ॥ ह० ॥ १ ॥
शरीर तुजला फिरवी मिरवी मानस गेलें कुसून लवकर सरकीं पडसिल नरकीं हरी भक्तिही नसून ॥ २ ॥
॥ रती विलासीं लंपट होसी मानस गेलें डसून लवकर सरकीं पडसिल नरकीं फुकट मरसिल कुसून ॥ ३ ॥
॥ आळसिकामा उगारिकामा थट्टाचि करसी बसून कुकर्माच्या कांहीं वर्माच्या गोष्टि काढिसी किसून ॥ ४ ॥
॥ म्हणे सोयरा गुरूनाथहा माझे हृदयि घुसून जनासि उद्धरावया कारणें वचन सांगतों ठसून ॥ ५ ॥

॥ ५३ ॥

उघडा कीं हा चालवितो कान डोळा हालवितो दृश्य दिवा मालवितो ॥ धृ० ॥
॥ ब्रंह्मरुप झाली दृष्टि मुखें निवती त्याची गोष्टी ॥ १ ॥
आंगची झालें निरंजन मन हें झालें उन्मन ॥ २ ॥
सुत्र धरोनि उभी माउली हे काया खेळे बाहुली ॥ ३ ॥
सकळ भरलें तत्व निरीं जग बुदबुद हें तयावरी ॥ ४ ॥
सोहिरा म्हणे हेंचि धन्य आंगीं भरलें चैतन्य ॥ ५ ॥

॥ ५४ ॥

आमुचा एथ अपराध काय आंगीं भरलें निरामय जो इंद्रियें चालवी त्याणें धरिली आपली सोय ॥ धृ० ॥
॥ डोळा झाला ब्रंह्मरुप, वाचा करिते अलाप, मनासी घडला हाची जप ॥ १ ॥
॥ इंद्रियातें उपेक्षूनि, धारणा हे रक्षूनि गेला आपुलें मूळ लक्षूनि ॥ २ ॥

॥ ज्ञान-वैराग्य हा आगळा, भवीं असोनि वेगळा झाला अभिमान हा पांगळा ॥ ३ ॥

॥ नको पाहूं देहाची चाल, दृष्टी करोनि सखोल, घ्या तुम्ही अनुभवाचे बोल ॥ ४ ॥

॥ ऐसें कवणी केलें कवण जाणें सोहिरा म्हणे मी हें नेणें पदरीं बांधलें अविनाश देणें ॥ ५ ॥

॥ ५५ ॥

झाला हो झाला आनंद आजी ॥ धृ० ॥

॥ इंद्रिय दमन करोनि त्रिकुटीं गमन, होतां योगाचें शमन नेणों काय म्यालें मन ॥ १ ॥

॥ लागतां खेचरी मुद्रा, उल्हास हाचि समुद्रा, पिउनी अर्ध चंद्रा, आलि सहज निद्रा ॥ २ ॥

॥ चंद्र सुर्यबींब ग्रासूनिया, प्रतिबींब सदा स्वयेंचि स्वयंभ विकासला निरालंब ॥ ३ ॥

॥ बारा सोळा आकळा, अनुभव हा मोकळा, जीव शिव हे नकळा सेविली सत्रावी कळा ॥ ४ ॥

॥ तूर्या हे भोगूनि, गेलों आंतची विरागुनी, नये हे कल्पना मागुनि, ठेलों हे उन्मनीं लागोनि ॥ ५ ॥

॥ सोहिरा म्हणे ज्ञान गहन, स्नान झालें गुरु दयेन, जेथ न पावती नयन, तेथ झालें शयन ॥ ६ ॥

॥ ५६ ॥

आनंद जिराला जिन्मयें बोध मुराला ॥ धृ० ॥

॥ नाहीं एक दुजें पण आपेंची आपण, आपणचि नसेल तेचि काय असेल ॥ १ ॥

॥ असलें पणही नासलें मज म्या ग्रासिलें नकळोनियां कळलें कळेल पण ही गळलें ॥ २ ॥

४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

॥ सोहिरा ह्मणे दाऊं कसें तुला काय दिसे ॥ ३ ॥

॥ ५७ ॥

स्थिरावली नीज दिठी, आपायें पडली मीठी ॥ धृ ॥

॥ आगमा निगमा गुज, तेंची सुख स्वयें बुज, लागली सहज नीज हो ॥ १ ॥

॥ चहूं शून्य महा शून्य बुडोनि लाधलें मौन्य, भोगिलें चित्सुख चैतन्य ॥ २ ॥

॥ आकाशाचा भरला कुंभ कवणीकडे प्रतिबींब, विकासला निरालंब ॥ ३ ॥

॥ जेथ गेल्या नाहीं येणें, हे ज्याचा तोचि जाणें, कुंठलें वाचेचें बोलणें ॥ ४ ॥

॥ सोहिरा ह्मणे मज, माझी मावळली नीजीं निजगैब झाला योगीराज ॥ ५ ॥

॥ ५८ ॥

मोहीलें आजि मनचि तेणें हो ॥ धृ० ॥

॥ कळोनि नकळे तें मीपण गळतें, विश्व चळतें ही ज्याणें हो॥१॥

॥ नाहीं रूप रेख, गुप्त व्यापक देख, ऐसा कवण म्या नेणें हो॥२॥

॥ सोहिरा ह्मणे देह, गमलें निःसंदेह, जैसें वाटेचें येणें हो ॥ ३ ॥

॥ ५९ ॥

आजी म्या सुखी झालोंचि सयें हो ॥ धृ० ॥

॥ निरालंबी पडली हे मिठी, कांहीं केलीया दिठी परतोनि नये हो ॥ १ ॥

॥ चित्कलीका विकासला, झाला चित्सूर्य उदय हो ॥ २ ॥

॥ निरंजन नित्यानंद निर्गुण निर्मळ निरामय हो ॥ ३ ॥

॥ सोहिरा ह्मणे निजधामीं, अनामीं गेलेंचि हें मन विलय हो ॥४॥

॥ ६० ॥

प्राण्या दैव कसें उणें झालें देवा तुज करुणत्व न आलें ॥ धृ० ॥

॥ अमृता माशी दृाहतों, आणि विषय कांजी प्यातों ॥ १ ॥

॥ जागृतिची नांवड, कैसें स्वप्नची वाटतें गोड ॥ २ ॥

॥ अनर्घ्य रत्न हारा टांकूनि पदरीं घेतों गारा ॥ ३ ॥

॥ लटक्याचि मृगजळा, देखुनि तृष्णेचा पसरीं ताळा ॥ ४ ॥

॥ गुरुकृपा माऊली सांडूनि ताडाची घेतों सावुली ॥ ५ ॥

॥ भवदोराची नागीण खाय, कर्म झाडणी गाळून घेई ॥ ६ ॥

॥ नवचे अविनाशाचे घरीं, वृत्तिधांवे दृश्यावरीं ॥ ७ ॥

॥ आतां निरसीं हे माया माव, नांद तूं अंतःकर्णी देव ॥ ८ ॥

॥ सोहिरा म्हणे मज हें देणें, आतां तूं तो कीं मी तो होणें ॥ ९ ॥

॥ ६१ ॥

जग हंते रंग रंग संग ॥ धृ० ॥

॥ क्षणेक भासवी विषय विलास, अवघा त्रास अति पावे नाश॥ १ ॥

॥ उन्हा योगें उरवरा संगें, देखोनि गंगे टकलीं जैसें गृगें ॥ २ ॥

॥ गळां शेळीचे स्तन कीं हें आरशांतील धन, जैसा जळावरील फेण तैसें निद्रिस्थांचे स्वप्न ॥ ३ ॥

॥ शरीर असें सकळ भासे तंव, विकार विंचूचें हें पेंव, लटिकेंचि तें चांगांव ॥ ४ ॥

॥ सोहिरा म्हणे कीं नेमी, जड हें शरीर नोहे मीं, आजी राहतों निज धामीं याचा समुद्र तो कीं मीं ॥ ५ ॥

॥ ६२ ॥

तरी हो काय येउनि जन्मसीं, विषयीं जडली गुळावरी जैसी मासी ॥

परिणामाच्या नलगे हो कामासीं ओळखेना भूत हृद्गतं या रामासी ॥ ध्रु० ॥

॥ चंचल चित्त हें परब्रह्मीं लागेना ।
सहज समाधी स्थीर हें राहेना ।
व्यापक चैतन्य सर्वत्र आहे नामीं ।
हा कवण ऐसें जरी पाहेना ॥ १ ॥
॥ चित्सूर्य हा उदय होऊं मागना अद्वया अब्जीं निजरोकां अनुरागना ।
सद्गुरु कांनीं वीज हें सांगेना निर्गुण निरंजनीं छंद हा लागेना ॥ २ ॥
॥ मन सहित इंद्रियेन निरोधी निमग्न राहेना जंवया ब्रह्मबोधीं ।
भृगवतन लगे या अमोदीं मोक्षाचि वाट कवस तें न शोधी ॥ ३ ॥
॥ सोहिरा म्हणे अविनाशक कैचें त्याला गंगा टांकून मृगजळीं जो न्हाला ।
अमृत म्हणूनि जो कांजी प्याला आपुले छायेसी आपण भ्याला ॥ ४ ॥

॥ ६३ ॥

तुझी दया ॥ धृ ॥
लटकी केली काया, निरसली हे माया ॥ १ ॥
मन गेलें विलया तुजसी चिन्मय निरामया ॥ २ ॥
॥ काया वेगडची वाहुली गमली अभ्रीची साउली ।
ऐसी अविनाश माउली ॥ ३ ॥
॥ जगदु ध्दुदिनिरा वितगरा वैरागरा । सोहिरा म्हणे अजरामरा ॥ ४ ॥

॥ ६४ ॥

निजानंदीं मन मुरलें उरलें चैतन्य ॥ धृ० ॥
॥ ज्ञान गंगे न्हालें पूर्णत्वा आलें झालें समाधान ॥ १ ॥
॥ असेसी लग्न होऊनि नग्न अंतरीं झालें मग्न ॥ २ ॥
॥ आश न वाहात भास न पहात चित्सुख सिंधू आंत ॥ ३ ॥

॥ न करी उखी विखी दृश्य न लेखी झालें सदां सुखी ॥ ४ ॥
॥ सोहिरा ह्मणे काया लटकी केली माया निर्गुण निराश्रया॥५॥

॥ ६५ ॥

काय झालें तें नयेचि सांगूं अंतरींची भोगूं ॥ धृ० ॥
॥ धृतिचा हा डोळा असतांचि कल्पना बाहुली हे परतली चालतां राहिली ।
चालती वाचा बोलेतांचि निमाली ॥ १ ॥
॥ पुढिलें हें थोकलें योजना मांडली आठवण मागली ।
दृश्य दृष्टा मनी न गणितां मीपण दोरीची हे काढिली ॥ २ ॥
॥ सोहिरा ह्मणे आतां हरपली मुद्रा सडलेंचि निद्रा उन्मनी लागली ॥ ३ ॥

॥ ६६ ॥

काय मिळालें हें नयेचि तुका झालों म्या मुका ॥ धृ० ॥
॥ ॐकार खुंटला शब्द मावळला न बोलवे अमुका ॥ १ ॥
॥ बुद्धी विहंगिणी संसार तरु वरी उडों जातां मुळीं मोडला डोंका ॥ २ ॥
॥ साधन नका नलगे तिरुका सांपडलें फुका ॥ ३ ॥
॥ सोहिरा ह्मणे भ्रांती त्रिमीर दवडूनि तन्मये उजळूनि चिन्मय दिपीका ॥ ४ ॥

॥ ६७ ॥

काय सांगूं सये बोल नये असुखा लागोनि ॥ धृ० ॥
॥ चोरोनि नेलें विश्वचि येतां उरला ना मागोनि ॥ १ ॥
॥ तन्मय शेजे परा प्रमदा निमाली भोगूनि ॥ २ ॥
॥ सोहिरा ह्मणे आतां तूर्येत जागोनि । लागोनि उन्मनीं निजलों निरंजनीं । जागणें त्या लागोनि ॥ ३ ॥

॥ ६८ ॥

सांपडला देव आजी भला मला आनंद झाला पूर्ण॥ धृ० ॥
॥ व्यक्तनावरी ताटस्थ कर्ण वाईले अंतःकर्ण ॥ १ ॥
॥ चहूंवाचा गुंज स्वरूप सहज अनादि बीज ॥ २ ॥
॥ झाला हर्ष त्वचेवीण स्पर्श इंद्रियां नाहीं दर्श ॥ ३ ॥
॥ मीपणा सुटी पडली मीठी आजी विरक्ती वाढली मोठी ॥ ४ ॥
॥ न लावितां अग्र देह हें भग्न सोहिरा ह्मणे झालों मग्न ॥ ५ ॥

॥ ६९ ॥

शिव स्मर हर हर गिरीजावर ध्यानीं ॥ भजन पूजनीं
कल्याण कर्ता दाता हा वरदानीं ॥ धृ० ॥
॥ विभूति विराजित पिशाच सहचर वास स्मशानीं ।
पंचवदन त्रिलोचन भूषित नाग कुंडलें कानीं ॥ १ ॥
॥ गजचर्म व्याघ्रांबर धरवर आसनीं । कैलास भुवनींचा नृपवर
कितपोनाथ हा योग ज्ञानी ॥ २ ॥
॥ द्वापार युगीं कीं किरात रुपें हा महाकानन स्थानीं ।
पार्थाप्रति हा झुजत घेऊनि तर्कस आणि कमानी ॥ ३ ॥
॥ ह्मणे सोहिरा सकल सृष्टिचा प्रळय करित निदानीं ।
भक्त काज कल्पद्रुम शंभुस्वात्म सुख दम्यांनी ॥ ४ ॥

॥ ७० ॥

सद्गुरु प्रसन्न झाला विश्रांतिसीं हृदयी आला ।
पूर्णा नंदें जीव धाला अखंडा कारे ॥ धृ० ॥
॥ दृश्य भान छेदिलें चंद्र मंडळ भेदिले ।
पिंडीची या शोधिलें, आत्म या रामा ॥ १ ॥
॥ जेथ सुखावले संत ज्ञानवन वसंत ।
विवेक झाला पर्संत सर्व देखणा ॥ २ ॥

॥ विश्व चळतें कीं हें जेणें ज्या नाहीं येणें जाणें ।
मार्गस्थ जिवाचें पेणें, देह हें जाणा ॥ ३ ॥

॥ ब्रह्म व्यापक जेथवरी अनुभव झाला तेथवरी
आतां कांहीं हेतवरी राहिला नाहीं ॥ ४ ॥

॥ संसार हा बाजार करितां न पवे अजार ।
सुटला आहे शेजार अहंकाराचा ॥ ५ ॥

॥ सोहिरा ह्मणे रामाधिस्थ ज्या नाहीं उदयास्त ।
संप्रज्ञातीं छंदस्त स्वात्म सुखें या ॥ ६ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

॥ ७१ ॥

तुह्मीं वदा सकळ साधु वृंदा न करावी निंदा ॥
सोडुनि सकळ धंदा संगति सद्गति पावे जीवें हा अक्षय
परमानंदा ॥ ध्रु० ॥

॥ ते संत, वृत्ति त्याची संत, विषयासी असंत, जे कां न करिति
पसंत ।
जेथ जाती तेथ चित्सुख ज्ञान वनाचे वसंत ॥ १ ॥

॥ जे गाति स्वरूपाचे संगाति, देह हें जाण तुं माती ।
मिथ्या हें कुळ जाती, अजरामर रूपीं तद्रूप झालें हारपली
दीनराती ॥ २ ॥

॥ ज्याचें मन झालें कीं उन्मन, इंद्रिया दमन, पुनरपि नाहीं आ-
गमन ।
खेचरी मुद्रा लावुनि उपाहीं, निर्गुणीं केलें गमन ॥ ३ ॥

॥ शरण यावें त्याला, नको मानुं भलत्याला ।
द्वेषीं भ्रम त्याला, पर सुखीं झुरत्याला ।
ह्मणे सोहिरा भाषण करणें, पाहुनियां पुरत्याला ॥ ४ ॥

॥ ७२ ॥

चाल किता.

सद्गुरुसीं इटका आतां करा आपली सुटका ॥
दृश्य भास नाश पावे स्थिर नोहे घटका ॥ धृ० ॥
लींग देहीं यम दुतां सांपडला अटका ॥
आत्मज्ञान उमजोनिया आधींच तुह्मी सटका ॥ १ ॥
करितो लिला टिळे माळा प्राणि निट नेटका ॥
केव्हां नेणों पाठीवरी काळ मारील मुटका ॥ २ ॥
भजनावांचूनि वेळकधीं घालवूं नको लटका ॥
मनीं राम, मुखीं नाम, करीं माळ चुटका ॥ ३ ॥
सोहिरा ह्मणे राहूं नका घट जैसा फुटका ॥
निरंजनीं पूर्ण बोध प्रेम पिवा घुटका ॥ ४ ॥

॥ ७३ ॥

संत ज्ञातिचे सर्वांशीं अद्वेषी ॥
इकनक त्याला हे सर्वही जन कीं द्वेषी ॥
वरतीं दाविती गौलता हे देशी ॥
त्याच्या सन्मानें परम होती क्लेशी ॥ धृ० ॥
गाई हिंदुसी परम पूज्य मान ।
देखूनि दुःश्चित हे मनीं मुसलमान ॥
खाऊनि दुभतें कीं निदानीं बेईमान ।
सुंदर वनितेचा कामीक दुस्मान ॥ १ ॥
वृक्ष आहे कीं उगाचि आपुले ठाईं ।
वाटेन जातो तो मौजेने घाली घाई ॥
तो तव कोणाचेंच खात नाहीं ।
अन्यायाविण घडती हे अपाई ॥ २ ॥
चंद्र उदयीं कीं समस्त सुखी होती ।
तस्कर देखोनि परम दुःखी चित्तीं ॥
अस्तमान व्हावा हें हृदयीं चिंतीं ।

निंदक जनासीं साधुची हे खंती ॥ ३ ॥
॥ हंस खळें सेवितो मुक्त फळें ।
स्वाद कैसा हा नेणती कावळे ।
त्याचे अंगीचें जरी कां मास मिळे ।
मूर्ख साधुचे लांच्छनीं देती डोळे ॥ ४ ॥
॥ ज्याणे साधूचि संगत करावी ।
त्याणें आधीच पुरती पारख घ्यावी ।
जीवींची खूण हे जाति निशी समजावी ।
परतोनि सोहिरा ह्मणे प्रीत वाढों न द्यावी ॥ ५ ॥

॥ ७४ ॥

संताचे दुर्गुण टांकुनि श्रेष्ठचि सद्गुण घ्यावा ॥ धृ० ॥
॥ सुमनी सुवास येतो मोठा । शेवंती सर्वांगासी कांटा ॥ १ ॥
॥ दीपा अंगीं अवगुण असती ।
प्रकाश होतां अवघे न दिसती ॥ २ ॥
॥ द्वाड वनिता हे रुपवती । कामीक पुरुषा प्रीयकर होती ॥ ३ ॥
॥ धनाचि मोट ओझे भारी । केवीं त्यागिती नर संसारीं ॥ ४ ॥
॥ समुद्रक्षारें न शमे तान्ह । पुण्यासाठीं करणें स्नान ॥ ५ ॥
॥ हिरा कठीण नव्हे अरुवार । उजळल्या होतो तासेवार ॥ ६ ॥
॥ क्रुर स्वाभाविया रणशूरे । त्याला अवश्य पाळीं धूर ॥ ७ ॥
॥ बाळ उन्मत्त पिशाच साधू । मात्रचि घ्यावा ब्रह्मबोधू ॥ ८ ॥
॥ सोहिरा ह्मणे ग्राहिक ज्याचा । तोची संग्रह करील त्याचा॥९॥

॥ ७५ ॥

दुटाली

पाव ज्ञान दाव ध्यान लावी या मना ॥ धृ० ॥
॥ याच देहीं याच डोळां मुक्तिचा सोहळा ।
भोग राज योग वश्य करोनि सांडी कामना ॥ १ ॥

॥ दिसतें तें हें नासतें कीं हे अविनाश असतें कीं हें ।
वसतें तुझे हृदयीं असोनि तुजला कामना ॥ २ ॥
॥ सद्गुरुसीं शरण जावें हमेशा भजावें ।
निजगुज हें बुजावें जावें गमन गामना ॥ ३ ॥
॥ सोहिरा ह्मणे आहे नाहीं पाहीं तूं सबाह्यब्रह्म ।
अंत वंत नंत रूप निज धामना ॥ ४ ॥

॥ ७६ ॥

प्राणिहो सदा सुखी रहा ॥ धृ० ॥
॥ स्थूळ देह हें कोठूनि चाले कवण यांतुनि बोले ।
विषय सुखांत कोण डोले ।
दृष्टीं कोण मी पहा ॥ १ ॥
॥ पंचभूत संयोगें सकळीक सुखदुःख हें सहा ।
जीव होत्साता शिवरूप मी कधीं सोडूं नको धीर हा ॥ २ ।
॥ ह्मणे सोहिरा बुद्धियोगें हीं इंद्रियें आकळीं दाहा ।
सहज समाधी निमग्न होऊनि ह्मणूनि ध्या तुह्मी अहा ॥ १ ॥

॥ ७७ ॥

काफीराग

जगज्जीवनजी दिनोद्धार ॥ धृ० ॥
॥ आत्मानाम विवेक सुमति सुख दाति हें सारासार ।
लटीकें देह हें गेह करूनी जीव भोगितसे दुःखफार ॥ १ ॥
॥ भुक्त करोनियां गुप्त स्वरूपीं देह दर्शन उक्त प्रकार ।
हे विश्वंभर करुणाकर लवकर भवसिंधू करपार ॥ २ ॥
॥ योग युक्ति दे शुन्य मंडळीं मन हें जाऊं एकवार ।
भक्तकाजकल्पद्रुम सद्गुरुदाता परम उदार ॥ ३ ॥
॥ ह्मणे सोहिरा काम क्रोध मदमत्सर दानवां करणें मार ।
युगायुगीं तूं धरिशी नानारूपलीला अवतार ॥ ४ ॥

॥ ७८ ॥

कांहीं मोक्षाचि तरतुज करणारे । काळ हरणा, सार्थक करणार, मनबुद्धि आवरणारे ॥ धृ० ॥

॥ कर्म हें कसुटे, सहसा न सुटे, जावत्किरणा देह हें तावत पोट - भरणारे ॥ १ ॥

॥ निजसुख उगम, पावुनि सुगम, आगम निगम मौनावतीर्ते पद पाव तूं भवनदी पार उतरणारे ॥ २ ॥

॥ सोहिरा ह्मणे अहंकृति न ह्मणे, नाथ दृंथ संकेत सतत सुखि जीव रूप हें उद्धरणारे ॥ ३ ॥

॥ ७९ ॥

विवेक हा गोरक्षक गोधने राखे । विरळा कोणी देखें सद्गुरु कृपें ॥ धृ० ॥

॥ उन्मेष पाहांटे अक्वटें सोडी भेदांची हे काडी सेवूंची हे नेदी॥१॥

॥ मन पवन फाठी वैराग्य करतटीं, विषयांच्या आवाठीं धावूं नेदी ॥ २ ॥

॥ षड्चक्रें चाहाटान्हे, ओलांडूने सरळ सुशुम्नेचें पाणथिंनें ॥ ३ ॥

॥ ब्रह्मरंध्र डोंगरा, निजसुखचरा, सत्राविच्या निरा पाचवुनियां॥४॥

॥ गोल्हाट टांकुनि, औठ पिठावरुनि, आणितो गोठणीं, सहस्र दळींवा ॥ ५ ॥

॥ अन्वय व्यतिरेकें हांकोनी पैठा, हृदयाचा गोठां, आणूनि बांधी ॥ ६ ॥

॥ बांधणूक कैसी नवलाव, परि सोहिरा ह्मणे जेथ दावें ना दोरी ॥ ७ ॥

॥ ८० ॥

नवल हें गुप्त समाधी सहज चित्सुख नींजीं निजती निजयोगीराज ॥ धृ० ॥

॥ नाथीलें हें मृग देखोनि आला, वेडा हा पारधी पाठीं लागला।
लागतां लागता पूर्वे निघाला अवचितेंची वरचे डोंगरीं गेला॥ १॥
॥ पावतां पावतां डोंगरही विसरला, पारध्यासीं मृगें समूळ ग्रासिला।
ग्रासितां ग्रासितां मृगही निमाला, सोहिरा ह्मणे तें सुख ला-
धलें मला ॥ २ ॥

॥ ८१ ॥

परतोनि मांगता आतां नये हे दिठी ॥ धृ० ॥
॥ योगाची पाउठी, करोनि शून्याचीये भेटी, आगीं आलों उठा
उठीं । स्थीर बैसलों गोल्हाटीं ॥ १ ॥
॥ अभ्यास वारुवा वरोनि, सुषुम्ना विवर फोडोनि, झालों परेपार
उतार निज सुखासवें पडली कीं मीठी ॥ २ ॥
॥ वैखरी मध्यमे माजी, विराली सहजी, पुढें आली निजमुखें सु-
चेना गोष्टी ॥ ३ ॥
॥ स्वनुभवहटीं, स्वानुभुती हे गोमटी, भेटीं होऊनि प्रेमें पदरा
दिधली गाटी ॥ ४ ॥
॥ सोहिरा ह्मणे निजपद पटीं तें रूप डोळ्यां वाटीं, पिऊनि उ-
मजेना काय झालें शेवटीं ॥ ५ ॥

॥ ८२ ॥

आपेंची लागली जेथ उन्मनीं निज ॥ धृ० ॥
॥ संकल्प हा त्यजीला, त्यजुनि निजगुजबुजला बुजुनि निवांतवि
निजला करोनि चिन्मय सेज ॥ १ ॥
॥ मन बुद्धि एक घडलें सुषुम्नीं सर्वे भिडलें, दशवें द्वार उघडलें,
समुळेंसी संसारा या पडलें कीं पूज ॥ २ ॥
॥ सोहिरा ह्मणे आलें मौन्य, शून्यामाजी गेलें शून्य, उरलें हे चै-
तन्य, निरालंब सहज ॥ ३ ॥

॥ ८३ ॥

निज जननीं संत सुखावले जिच्या संगा लागोनि ॥ धृ० ॥

॥ आदि अंत नाहीं जिशीं, पूर्णा नंदाची राशीं ।
भोगिति हे निजत्यासीं, श्रवण मननीं ॥ १ ॥

॥ नाहीं जेथ यम नेम, आपणापें आराम ।
शुद्ध सुमन शमदम, मदन मालीनीं ॥ २ ॥

॥ टांकिलें हे त्रिकूट भेदोनिया श्रीहट ।
वस्तीला गोल्हाट, औठपीठ वासीनि ॥ ३ ॥

॥ सोहिरा ह्मणे चतुष्पदा, भोगोनियां परमपदा ।
भोगिती अधुपम्न स्वादा, तुर्या दुन्मनीं ॥ ४ ॥

॥ ८४ ॥

गुरुकृपेचें हें देणें समाधान केलें येणें ॥ धृ० ॥

॥ पावविलें ऐशा खुणे, जेथ नाहीं येणें जाणें ॥ १ ॥
॥ सुखें आंतचि डोलणें, प्रेम नयेची बोलणें ॥ २ ॥
॥ निका तुटला भेदाभेद, झाला सहज आनंद ॥ ३ ॥
॥ विकासलें निरांजन उन्मळीले हे लोचन ॥ ४ ॥
॥ मना नाहीं हो संचार, ऐसें अगम अगोचर ॥ ५ ॥
॥ नाम रुप नाहीं ज्याला, ऐसा गैबची हा प्याला ॥ ६ ॥
॥ मज बैसविलें स्वस्थ, जेथ ऊदो नाहीं अस्त ॥ ७ ॥
॥ पडे मघाविण पाऊस, चांदणेंविण विकास ॥ ८ ॥
॥ परमामृत पारणें, मज झालें सोहिरा ह्मणे ॥ ९ ॥

॥ ८५ ॥

तेव्हां झाली तुझी दया । निर्वास निश्चय सद्गुरुराया ॥धृ०॥

तेव्हां झाली तुझी दया । मग सहजेंची तुटली माया॥१॥
॥ झाला नाहींची दिसेल काया । मग सहजेंची तुटली माया ॥ १ ॥
॥ वृत्ति स्थिरावले शुन्या माजी प्रकाश चैतन्या ॥ २ ॥
॥ मन सीठपणाची मुद्रा, विराली तुजशीं समुद्रा ॥ ३ ॥

॥ जगबुद्बुदीं तोय एक, तरी जागला विवेक ॥ ४ ॥
॥ आरंभ रंभ स्तंभा, गैब त्रिकाश निरा लंबा ॥ ५ ॥
॥ निज सुखाचें पडलें ओल, गोड लागती उदास बोल ॥ ६ ॥
॥ सोहिरा ह्मणे विसरें घडलें अंगीं अञ्जण अम्मल चढलें ॥ ७ ॥

॥ ८६ ॥

निज निलय निवासी जोगीहो ॥ धृ० ॥
॥ नित्य निरंजनी निद्रा, चिन्मय लेऊनि कानीं मुद्रा ॥ १ ॥
॥ अखंडीत सोहं जप, शीरीं तन्मयाचा टोप ॥ २ ॥
॥ सर्व वृत्ति नांगडिया, चालि पश्चीमे गोदडीया ॥ ३ ॥
॥ भक्ति वैराग्यें वाहविली, शुद्ध सत्व ज्याची शैली ॥ ४ ॥
॥ अनुहात शिंगी वाजे, तेणें गगन मंडळ गाजे ॥ ५ ॥
॥ नाद बिंदुला जोती, आंगीं लावूनी त्रिभूति ॥ ६ ॥
॥ भोगी असतां जो वितरागी सोहिरा ह्मणे राजयोगी ॥ ७ ॥

॥ ८७ ॥

ज्ञान गंगातीरवासी वैरागी ॥ धृ० ॥
॥ हांसत खेळत डोलत बोलत नित्य वैरागी ।
तन्मय बिजा सेवूनि सहजा रंगे निजरंगीं ॥ १ ॥
॥ चिन्मय गोपीचंदन नामें उजळी निर्वांगीं ॥ २ ॥
॥ बोध कमंडलू दंड विवेक त्रिवेणी मार्गीं चालत चालत ।
पश्चिम पथीं मध्यमा सुरंगीं ॥ ३ ॥
॥ भोगूनि त्यागी जो इतरागी सोहिरा ह्मणे राजयोगी ॥ ४ ॥

॥ ८८ ॥

नाच नाचें नाचें नाचेरे या हरी रंगीं नाचे ॥ धृ०
॥ सहज समाधि लागे निद्रे माजी होईजे जागे ।
समाधान मनाचें ॥ १ ॥
॥ भ्रमर गुंफें रहाणें निरंतर स्थिर होणें टळटें मान लोचनाचें ॥ २ ॥

॥ बद्धता नाहीं मग मुक्तता कैंची । नाम नुरे मोचनाचें ॥ ३ ॥
॥ सोहिरा ह्मणे मींची नाहीं मग दुजा तेथ कैंचा ।
पाहीं काज राहिलें पवनाचें ॥ ४ ॥

॥ ८९ ॥

ऐसीकवणाची कोण हे खुणाविती हो ॥ घृ० ॥
॥ मेरूचिया वरतीं, चंद्रसूर्याचिये परतीं ।
जेथ दिवस ना रातीं ॥ १ ॥
॥ हात देऊनि केधवां नेणो किं दृश्याचा हा दीवा मालविती हो ॥ २
॥ येदि विकाराचें कांकण वाजो । ह्मणे अति गुह्यानें निजो ।
परतोनिया कदांपिनुमजो ॥ ३ ॥
॥ काढी भेदाचें जोडवें परे पैलाड पडवें सुख स्वानंदें क्रिडावें॥४
॥ ह्मणे वासना लुगडें फेडूनि व्हावें उघडें ।
तें सुख बोलतां कां नडे ॥ ५ ॥
॥ सोहिरा ह्मणे ना व्यभिचार, आंगीं बोधाचा संचार ।
योगी जाणती चतुर ॥ ६ ॥

॥ ९० ॥

ब्रह्मबोधेंचि निवालें । आतां म्या काय बोलों ॥ धृ० ॥
॥ पहातां पाहाणें उडालें, लय लक्षचि बुडालें, कोठें नेणों विसा-
वलों ॥ १ ॥
॥ असलें पण न मोडतांचि, म्या नसले पणचि, असें कांहीं न
होऊनिया ठेलों ॥ २ ॥
॥ कोणें कांहींची ना दिधलें, नेणो कैसें समाधान हें झालें ।
नित्य डोलोंचि लागलों ॥ ३ ॥
॥ प्रचिती पंखीं उडोनी गेलों, पहिलाची पागळलों, अवघे अंबर-
चि झालों ॥ ४ ॥
॥ सोहिरा ह्मणे आंगीं आलें, गाढें म्या मौन्यचि माखिलें, माझा

मग्नचि ग्या ग्यालों ॥ ९ ॥

॥ ९१ ॥

परब्रह्म पद भोगि हा जोगी ॥ धृ० ॥
॥ मुखाविण कैसी पहा वाजवीतो अनाहत शिंगी ॥ १ ॥
॥ आंगाचि नाहीं हें प्रचितीची पुरी गोधडी हे अंगी ॥ २ ॥
॥ ह्मोरें आले दृश्य कदाचि नेघी ह्याला वितरागी ॥ ३ ॥
॥ भोगहि न ह्मणे त्यागही न जाणें सोहिरा कमला राजयोगीं ॥४॥

॥ ९२ ॥

झाला ब्रह्मबोध लागली समाधि॥ धृ० ॥
॥ सुषुप्तीच्या छिद्री । स्थिरावलें ब्रह्म रंध्रीं भेदोनियां नादबिंद ॥१
॥ मनावाचे नाकळे, ऐसें देखिलें निराळें रूपाविण हें अगाध ॥ २॥
॥ सोहिरा ह्मणे काय वाणूं, हरपलें देहभान सद्गुरु भेटला हा सिद्ध ॥ ३ ॥

॥ ९३ ॥

झालें हो समाधान गुंतोनि कोठें नेणो ठेलें हें मन ॥ धृ० ॥
॥ त्रिकुटाचे वाटे उघडूनियां द्वारवटें, भेटे आले कोण नेणो कोठें अवचटे ॥ १ ॥
॥ पुढली कीं हे मागली, नेणों कैंची चांगली, अतर्क्यंची लागली निद्रा हें सहज ॥ २ ॥
॥ जन्म नाहीं मरण, जेथ व्यक्त नाहीं पर्ण सोहिरा सच्चिदानंद आजी पूर्ण ॥ ३ ॥

॥ ९४ ॥

लावोनि लग्न मग नमन ठेलेहो ॥ धृ० ॥
॥ काया नाहीं माया तया ठायां लया गेलें हो ॥ १ ॥
॥ हृदगत सदया हृदया उदया आलें हो ॥ २ ॥
॥ संकल्प हा क्षया जाऊनि अक्षय दया लेलें हो ॥ ३ ॥
॥ आरंभ रंभ स्तंभीं निरालंबीं गैब झालों हो ॥ ४ ॥
॥ तुटला संसार घोंटूनि झटका प्रेम गुटका प्यालें हो ॥ ५ ॥

सोहिरा म्हणे जेथूनि येणें ज्याचें तेणें न्हेलें हो ॥ ६ ॥

॥ ९५ ॥

ऐसी राऊत राहटी, वैसे पवनाचिये पाठीं ॥ ध्रु० ॥
॥ घेऊनि विवेक भाले काठी, लागे भेदाचिये पाठीं ॥ १ ॥
॥ आंगीं वैराग्य चिलखत सूये, लागों नेदी द्वैताचा घाय ॥ २ ॥
॥ शांतीचें हें ठेवूनि जीन, वरी घातलें आसन ॥ ३ ॥
॥ धरी शम दम लगाम, अन्वय व्यतिरेकें सुगम ॥ ४ ॥
॥ धारणेचा हा चाबूक, धरी षट्चक्रांचा रोंक ॥ ५ ॥
॥ सोहिरा अधारीहूनि मारी निघे ब्रह्म रंध्रा भीतरी ॥ ६ ॥

॥ ९६ ॥

तरी ते धन्य संसारीं, इंद्रियें वळविती जे माघारीं ॥ ध्रु० ॥
॥ वृत्ति नेती त्रिकुटावरी, मिळोनी जाती निराकारी ॥ १ ॥
॥ मी हा कवण ऐसें पहाती, तटस्थ होती नेत्र पातीं ॥ २ ॥
॥ जे जीवंतची मेले, मरोनि पुनः जीवे झाले ॥ ३ ॥
॥ उदय नाहीं अस्त, तेथ झाले समाधिस्थ ॥ ४ ॥
॥ तयां कैसें हो गणावें, देव कीं मानव म्हणावें ॥ ५ ॥
॥ डोळां भाले या कवळ, चर्म दृष्टी दिसतें स्थळ ॥ ६ ॥
॥ त्यांची ध्यावी पैं कळेची, काया जाणावी मृगजळाची ॥ ७ ॥
॥ अवयव आनंदाचे, जे अंकुर चैतन्याचे ॥ ८ ॥
॥ सोहिरा म्हणे मी पाहीं, जया मीपण उरलें नाहीं ॥ ९ ॥

॥ ९७ ॥

सर्वीं सर्वत्र तूं पाहे, एथ कोणाचें काय आहे ॥ ध्रु० ॥
॥ पंच भूतांचे हे देह, तूं कां वाहसी संदेह ॥ १ ॥
॥ प्रपंच भूमीचें हें चित्र, हें तों तुझेंचि कीं सूत्र ॥ २ ॥
॥ दृश्य दिसतां गोड वाटे, जेथूनि आलें तेथें आटे ॥ ३ ॥
॥ जाण आकाशींच्या विहीरी, चैतन्य सिंधूच्या लहरी ॥ ४ ॥
॥ ऐसें ज्ञान जेथूनि झालें, देखणे त्यांत सामावलें ॥ ५ ॥

॥ सोहिरा ह्मणे जगीं आलों, बोलबोलूनि बोलासी ग्यालों ॥ ६ ॥

॥ ९८ ॥

कांहीं बोलावसें नाहीं, रूप डोळांवीण पाहिं ।
वाचेवीण बोलणें, जेथ पायावीण चालणें ॥ धृ० ॥
॥ कानावीण ऐके साद, जिव्हेवीण चाखे स्वाद ॥ १ ॥
॥ त्वचेवीण स्पर्श, भोगी चित्तावीण हर्ष ॥ २
॥ नाकावीण वास, पडे मेघावीण पाऊस ॥ ३ ॥
॥ सोहिरा ह्मणे इये खुणें, एक अनुभविया जाणें ॥ ४ ॥

॥ ९९ ॥

ऐसी अव्यक्त हे भिंती, विश्वचित्राकारें भिरविती ॥ धृ० ॥
॥ अहं ब्रह्मास्मि हा चूना, काढूनि लेपें योजिलीं नाना ॥ १ ॥
॥ पंच भूतांचा हा रंग, भरोनि प्रकृति हे अष्टांग ॥ २ ॥
॥ कल्पना हे चितारणी, करी नामासारखी रेखणी ॥ ३ ॥
॥ लेपें उमटती जाति क्षय, परी भिंती हे अक्षय ॥ ४ ॥
॥ भिंती नाहीं आदि अंत, हाचि योग्यांचा सिद्धांत ॥ ५ ॥
॥ सोहिरा ह्मणे लेपांचा पसर, मोडल्या भिंतीचा पडे विसर ॥ ६ ॥

॥ १०० ॥

हरी भजनावीण काळ घालवूं नको रे ।
॥ चित्तस्वरूपासी उमज, ध्यानी आणुनि समज ।
आपुले मतिनें उगाचि चिखल कालवूं नको रे ॥ १ ॥ हरी भ० ॥
॥ दोरीच्या सापा भिऊनि भावा, भेटि नाहीं जीवा सीवा ।
अंतरींचा ज्ञान दिवा, मालवूं नको रे ॥ २ ॥ हरी भ० ॥
। सोहिरा ह्मणे पूर्ण ज्योती, तेथें नाहीं दिवस राती ।
तयाविणें नेत्र पाती हालवू नकोरे ॥ ३ ॥ हरी भ० ॥

॥ १०१ ॥

सद्गुरु कृपेनें भाग्य ऐसें आलें रे । ब्रह्मानंदीं मन संतुष्ट झालें ॥ धृ० ॥

॥ सांपडली हे सुषुप्तेची वाट । देखियेला हा विवेकाचा हाट ।
तेथें झाली हे सद्वस्तूची भेट । रूप रेख नाहीं पाहातां पाठी पोट ॥ १ ॥ सद्गुरु० ॥

॥ आदि अंतीं पाहातां नाहीं शून्यीं । शून्य झामावलें ज्या चैतन्यीं।
अनिर्वाच्य होऊनी ठेला मौनीं । निद्रा लागली सहज उन्मनी २

॥ तत्त्व सेवियलें जें सज्जनीं । दिठी सुदली त्या ज्ञानांजनीं ।
तेणें तेजें लोपली तीन रजनी । निधी लाधली निर्गुण निरंजनीं ॥ ३ ॥ सद्गुरु० ॥

॥ उमजों मेला मीं कवण ऐसें आदी । नग्न झाला त्या अनाहत नादीं ।
निजबोधें हें गमनसमाधी । सकळां आदी रेखरूप अनादी॥४॥

॥ झाला चित्सूर्याचा प्रकाश । केला अद्वय अज्ञीनें विकाश ।
अध ऊर्ध्वी कोंदलें चिदाकाश । अनुभव त्वदर्पीचा वदला सोहिरादास ॥ ५ ॥ सद्गुरु० ॥

॥ १०२ ॥

विसरूं नको तो देव । जो साक्षी भूत स्वयमेव ॥ धृ० ॥

॥ तारुण्यकाळीं पुण्य दशेची । होऊं पहातसे चेव ।
रंगरूपाला भुलूं नको तूं । पहात स्त्रियेचे टेंव ॥ १ ॥

॥ अंतकाळ हा पावे तंव वरि । भव सागर हा पेंव ।
वैराग्य विवेकें संगा विरहित । सदैव सुख हें सेव ॥ २ ॥

॥ पराधीनता पावेल तेव्हां । विस्मय पडेल हा भेव ।
स्वइच्छ असणें यास्तव । घरघर भिक्षा मागूनि जेव ॥ ३ ॥

॥ म्हणे सोहिरा त्या वांचूनि । हें शरीर केवळ शव ।
सर्व प्रकाशक त्याचे सत्तें । चालति हे अवयव ॥ ४ ॥

॥ १०३ ॥

भगवंत दाता । स्वामी तो आठव आतां ॥ धृ० ॥

॥ परमानंद प्रकाशवंत । ज्याला नाहीं आदि अंत ॥
जो कां ध्याती अखंड संत । धरोनि जाती निर्गुण पंथ ॥
अंतरिक्ष हें लाऊनीयां लय, दृक्ष होऊनी मोक्ष सुखाला, सहज
समाधी रहातां ॥ १ ॥ भगवन्त० ॥
॥ जेथुनि झाली सकळ सृष्टी । त्याचा कर्त्ता न दिसे दृष्टी ।
ह्मणूनि होतें मन हें कष्टी । ऐकूनि अवघ्या ग्रंथीं गोष्टी ।
स्थावर जंगम नाना लीला । विचित्र वर्णीं शोभत धरणीं ।
तापत तरणी अगम्य करणी । चरित्र हें पहातां ॥ २ ॥
॥ ह्मणे सोहिरा आंगीं जडला । आधींच आहे नव्हे घडला ।
प्राणि हा संदेहीं पडला । उपाधींत सांपडला ।
त्याचे दृष्टीं ईश्वर दडला । ऐसा वेदांतीं निवडला ।
तो हा व्यापक आत्मा अंतरसाक्ष । परिपूर्ण सनातन गोड दि-
से गातां ॥ ३ ॥ भगवन्त० ॥

॥ १०४ ॥

भगवानलीला पहातां प्राण्या । तुज सुख दुःख कांहीं नसेरे
॥ धृ० ॥
॥ अदृश्य कला हे व्यापक सकळां । नेती ह्मणती वेद न कळा ।
नेणसी पाला जीवा तूं विकळा । शरीर चालवी जीवन कळा ।
हे दूरी कधीं नाहीं हा जवळीं असे रें ॥ १ ॥ भग० ॥
॥ अनन्यभावें भजन स्वभावें ॥ नाम ध्यावें अंतरीं ध्यावें ।
लय लावावें नित्य निरंजनीं । क्षणभरी जरी चित्त बसे रे ॥ २ ॥
पृथ्वी पहातां उदकीं वहातां । तेजीं दाहतां गगनीं साहतां ।
संनिधानीं मन पवन चलन करी स्थिर चरी हरी सर्वत्र वसे रे ॥ ३ ॥
॥ जन्मा नाहीं यावें जावें । देवचि अवघा ह्मणूनि भजावें ।
संगावीण संतोषी व्हावें, गुणत्रय परतर ब्रह्म रसें रे ॥ ४ ॥

॥ ह्मणे सोहिरा अतीत ईश्वर, पतीत पावन दीन बंधू हा जगदोद्धारण रे ।
सज्जन जन मोहन कारण, चिद्घन वनीं आनंद घन वर्षे रे॥५॥

॥ १०५ ॥

विश्वास ठेविं प्राणिया, नारायण हरी वर रे ॥ धृ० ॥
॥ ज्यानें निर्मिलें ब्रह्मांड, एवढी पृथ्वी नवखंड, तीन्ही देव त्रिभुवन खंड ।
यमधर्म जीवाला दंड भूतीं भूत पिंड, जेणें उदंड चालतसे हें शरीर रे ॥ १ ॥ विश्वास० ॥
॥ ब्रह्मादि वंदिती ज्याला, नेती वेद ह्मणती त्याला, या जगाचिया पित्याला ।
किं या विश्वभरोनि रित्याला, तूं नको कीं विसरूं त्याला, क्षण भाग्याचिये भरी रे ॥ २ ॥
॥ अवलोकुनियां भाळीं, घालीं योगासन हें त्रिकाळीं, दिठी देऊं नको आभाळीं ।
दृश्य पदार्थ या गाभाळीं, महा तारुण्य लहरी रे ॥ ४ ॥
॥ ह्मणे सोहिरा अवतारी, देव युगायुगीं अवतारी, जो पुरुष नव्हे नारी ।
हा आकार चित्र चितारी, नको घालवूं त्यावीण हो हे वांछा नाना परी रे ॥ ३ ॥

॥ १०६ ॥

भ्रम विस्मय गेला, देवें उद्धार केला ॥ धृ० ॥
अजरामर हें स्वरूप दावी, अनन्य भावें भक्ति लावी ।
महिमा तेचि वदनीं गावी, कितुकीं वचनी तीं सांगावीं ।
जन्मोजन्मीं हे मागावी, परतोनि दृष्टिनें उमगावीं ।
सज्जन जन मन रंजन हा भव भंजन नीरंजन निर्गुण ।
जो गंजन करि हरी व्यंजन नयनीं, अंजन भरी जीव तन्मय होऊनि ठेला ॥ १ ॥ भ्रम० ॥

॥ निरा लंबीं रहाणें ज्याला, मिळूनियां अजाला, कीं त्या भुवन त्रय राजाला।
करितो अनाहत बाजाला, विसरे तुझ्याला माझ्याला।
ऐसा लाल होऊनि काळ कलित कौतु हल तुंदल दलित चलित विश्वंभर भजनीं।
गलीत वलीत अभिमान होऊनि चिन्मय भुवनीं नेला ॥ २ ॥
॥ ह्मणे सोहिरा शरीर चर्म, आहे तंववरी घडतें कर्म; पूर्वार्जित हे धर्माधर्म।
अंतरसाक्ष हें जाणूनि वर्म, जेणें हरिले सकळ भ्रम, ऐके देखे स्पर्शे चाखे।
परिमळ येतो घेतो नाकें, वाचा बोले हात हाले, पाय चाले मैथून काले।
विसर्ग तोले, जागृत निद्रा स्वप्न सुषुप्तीं वर्त्तुनी ऐसा गुणातीत तो।
महा शून्य चैतन्याचि झाला जिताचि असतां मेला ॥ ३ ॥

॥ १०७ ॥

तूं कसारे तरशील प्राणियां या हरिभजनावांचूनि ॥ ध्रु० ॥
तुझें चंचळ हें बहु चित्त, घडी नससी सावचित्त, असें हेडसात्र चित्त।
नसे आत्मसुखाची प्रचित, असे मृत्यू हा अवचित, वित्त काय करिसी सांचवुनि ॥ १ ॥ तूं० ॥
केवळ बुद्धिचा तूं हीण, होशी शब्दज्ञानीं प्रवीण।
उपदेश उदकीं तूं पाषाण, सुख नेणसी विषयावीण।
वैराग्य न धरे क्षीण काय करशी ग्रंथ वाचूनि ॥ २ ॥ तूं० ॥
॥ सदैव वदनीं निंदा, आन नसेचि दुसरा धंदा।
तूं अजाण दुर्मति मंदा या विषय मदें मदांधा।
तूं स्वभावें रे बेबंदा, साधु संताला जाचूनि ॥ ३ ॥ तूं० ॥
। ह्मणे सोहिरा तूं मूढ रे, परमार्थ तुला गूढ रे।

बाहेर लौकीक करसी रूढ रे, या पुढें यम घेईल सूड रे ।
तुझ्या जिण्याला लागो चूड रे, अति इंद्रियां लालचूनि ॥ ४ ॥

॥ १०८ ॥

तूं राम राम स्मर रे, अगम अगोचर, अनादि सिद्ध, अच्युत
करुणाकर रे ॥ धृ० ॥

॥ असोनि न दिसे देहिं कसा असे ।
चाळवी हें अंतर रे । साधु समागम करूनि पुस ।
हा भवसागर तर रे ॥ १ ॥

॥ अंतवंत हें शरीर वास्तव । त्वरित सार्थक कर रे ।
विष शमूनि संतोष पावला । जपतां शिव शंकर रे ॥ २ ॥

॥ पूर्णब्रह्म वैकुंठपति । अवतार रमावर नर रे ।
लीला धारी पदीं शिळा तारी । बहु उद्धरले वानर रे ॥ ३ ॥

॥ लंकापतिसह दानव वधिले । महा हा धनुर्धर रे ।
ह्मणे सोहिरा रघुनंदन हा । वंदुनीनिरसींमायामय दुर्धर रे॥४॥

॥ १०९ ॥

भगवानजी तुजवीण क्षणभरी आन चिंती नामी ।
जनीं जनार्दन समान देखें हा प्रत्यक्ष देखें नयना मीं॥धृ०॥

॥ नासुनी पंचभूत सेनामीं । कवणची वागविणें भयनामीं ।
पळ एक पडों नेदी च नामीं । मग हें भोगणें ना दैन्यामीं॥१॥

॥ विषम बुद्धी धरी नामीं । जगीं या कोणाचाचि अरी ना मी ।
स्वप्रेम भरीत हरी नामीं । पुढतीं जन्म पढे तें करी ना मीं॥२॥

॥ विपरीत करी वमन नामीं ।
दृढतर निग्रह करीं कीं मना मीं । आकाशीं करी गमना मीं ।
न पडे कर्म दोष गमनामीं ॥ ३ ॥

॥ मुनीजन रंजना मीं शरण या भवभंजना मी ॥
ह्मणे सोहिरा निरंजना मी ऐसें करितों स्वामी ॥ ४ ॥

॥ ११० ॥

आनंदमय असो चित्त हें ॥ धृ० ॥

॥ दृश्य भास हा नाश पावे । घडी घडी यावर मन जें धांवे ।
परतोनि मुळींलें वळींलें व्हावें । समाधी सुख अवचीत हें ॥१॥

॥ स्थावरजंगम भूतग्राम । नाना लीला रूपनाम ।
आंतूनि खेळवी शरीरचर्मे । आहे नाहींहरी विरचित्त हें ॥२॥

॥ सर्व व्यापका अनंताला । प्राण्या स्मर तूं भगवंताला ।
तद्रुप मानीं जीव जंताला तुज सांगतों करी हित हें ॥ २३ ॥

॥ ह्मणे सोहिरा तारक स्वामी । लय लागो तें आत्मारामीं ।
ज्ञानकळा हे अंतर्यामीं । सदां कीं सावचित्त हें ॥ ४ ॥

॥ १११ ॥

आनंदलें बहु मन हें ॥ धृ० ॥

॥ करितां अंतर रूप तर्जन हें । प्यालें प्रेमाचें पर्जन्य हें ।
केलें विवेक उपर्जन हें । ऐकूनि अनाहत घन गर्जन हें ॥ १ ॥

॥ भवातूनि निघालें । केवळ महाशून्यीं रिघालें ।
ब्रह्मबोधेंची धालें । झालें उप शमदम उन्मन हें ॥ २ ॥

॥ व्यतिरेकें रिझालें । केवळ अन्वयावरी आलें ।
चैतन्यें तद्रुप झालें । न करीं पुनरपि आगमन हें ॥ ३ ॥

॥ सोहिरा ह्मणे हें निश्चळ । समाधी सुखेंचि क्रमते वेळ ।
पाहूनि भगवंताचा खेळ । आश्चर्यत जन वन हें ॥ ४ ॥

॥ ११२ ॥

कृपा कसा न करील तो हरी ॥ धृ० ॥

॥ कर्त्ता हर्त्ता ईश्वर भर्त्ता । क्रियमाणें हें आयुष्य सर्ता ।
पर्ता नाहीं इंद्रिय चरता । विपरीत अर्था भुलोनी जीव हा द-
गेंची गर्व हे धरी ॥ १ ॥ कृपा० ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ४९



परद्वारीं हें पातक आहे। वेदपुराणीं ऐकत जाये।
नरक नयनीं हा प्रत्यक्ष पाहे। बीभत्स अवघें सुखेंची साहे।
अति लुब्ध जो कामीनींवरी ॥ २ ॥
प्रतिपाळ करी कीं मदाचा। मार्ग न कळे ब्रह्म पदाचा।
करी आठव विवेक नदाचा। प्राणी जाण लहान कदाचा।
जो असत्यवादी सदांचा। ज्याची वाचाची नाहीं हे खरी ॥३॥
ह्मणे सोहिरा हा वर्त्तो। नेणें आत्मस्वरूपीं पर्तो।
कोण संग मी धर्त्तो। आणि काय मी हें कर्त्तो।
नित्य कोणाला मी स्मरतों। हें न कळोनी तृष्णा उठवी ना-
ना परी ॥ ४ ॥ कृपा० ॥

॥ ११३ ॥

अझुनी समजूनि काय बसलासी ॥ धु० ॥
संत समागम किमपि न रूचे। इंद्रिय वर्ग हे मिळवूनि लुचे।
परीणामाचें हीत हें न सुचे। नरदेहीं येऊनि तूं फसलासी ॥१॥
वंध्येचें संतान प्रपंच। एकचि जागीं मिळती पांच।
मिथ्या लागली तुज ही आंच। मोह चिकाला तूं डसलासी॥२॥
भ्रमलासी हा व्यास वाहतां। पाहिला ना कधीं स्वस्थ राहतां।
लाज न वाटे हें दुःख सहातां। कुसंगेंची तूं वसलासी ॥ ३ ॥
सोहिरा ह्मणे मूळ नसलासी। चुकलासी परब्रह्म असलासी।
अन्यथा ज्ञानें कसलासी। केवळ मूर्ख तूं मजला दिसलासी ॥४॥

॥ ११४ ॥

शिव शंभु शंकरस्वामी निजभावें पुजावा तुह्मीं ॥ धृ० ॥
व्याघ्रांबर गजचर्म धारी।
विभूति लेपन अवघे शरीरीं। कबरी भार जटाधारी ॥ १ ॥
वामांगी हे गिरीजा नारी। कंठीं धरिलें हळा हळा।
पंचमुख त्रिलोचन भोळा। आज्ञा समर्थ कळीकाळा ॥ २ ॥
वरती रूळति रुंडमाळा। ज्याला प्रीयकर शंखध्वनी।
आरुढोनि वृषभवाहनीं। स्मशानवासी
डमरू त्रिशूळ पिनाकपाणी।
विराजित भूफणी अजगर शशीशेखर गंगाध

3/1/1975

ज्याची पूजा करिती अमर । ऐसा अवधूत दिगंबर ॥ ४ ॥
॥ रिद्धिसिद्धी ज्याच्या दासी । स्मरणें सकळ पातक नाशी ।
ह्मणे सोहिरा निजभक्तांसी । उदार कैलासवासी ॥ ५ ॥

॥ ११५ ॥

दौलत देख दिवानी मेरी, अपने मौजन करना फेरी ॥ ध्रु० ॥
॥ कोही घडी बनियाके दुकाना, कोही घडी पर्वत पर ठिकाना ॥ १ ॥
॥ कबहु बभूत कुल्ल लगवाना, कबहु पगरीकू बनवाना ॥ २ ॥
॥ देखो पवनकी तो पागा, सोहं पिलखानेकी उजगा, ॥ ३ ॥
॥ करमका कारखाना, हमारा नसीब जामदारखाना ॥ ४ ॥
॥ तनकी करत है बिगार, मेरे छत्तीस खिजमतगार ॥ ५ ॥
॥ अहंकारकू सिछा, कर्ना मुलुख हमारी भिछा ॥ ६ ॥
॥ कहत सोहिरा तखतपर बैठे, *हरदम खुष दिलसे बैठे* ॥ ७ ॥

आरती.

॥ जयदेव जयदेव जय सच्चिदानंदा, विद्यारविंदा सदया पूर्ण प्रबोधा ॥ ध्रु० ॥

॥ मन मोहन गहना चित्सुख चिद्घना, जगदाखिल पालना लीला लालना, भवातीत देवा अभिनव भावना, आरती वोवाळूं तुज निरंजना ॥ १ ॥ जयदेव० ॥

॥ अनादि उदयीं झाला पूर्णिमा इंदु, देखोनी उल्हासला महानंद सिंधु, भक्तजन चकोरां अनुपम्य स्वादु पूर्णतेसी आले अविनाश दोंदु ॥ २ ॥ जय० ॥

॥ मायामय रजनी प्रकाश आला, द्वयरूप खद्योत निस्तेज जाहला, वैराग्याच्या वना ळवलव सूटला, विवेक भ्रमरा आंगीं आनंद दाटला ॥ ३ ॥ जय० ॥

॥ तन्मय कोकिळीची कलरव झरी, सुटला नाद अंबरीं अनाहत गजरी, सोहीरा दास ह्मणें मेरूचे शिखरीं, वरियली नार हे परात्पर सुंदरी ॥ ४ ॥ जय० ॥

गैची गर्द हे धरे

*× × पर बैठे " असाहि पाठ आहे. दौलतराव सिंदे हे एर (मन) देत असतां हें पद नाथांनीं दौलतरावास झटलेलें आहे.

॥ समाप्त ॥